कृषीवल
रायगड, शनिवार, दि. १३ एप्रिल २०२४
किंमत ४ ₹

## इराण, इस्त्रायलमध्ये न जाण्याचा सल्ला

**नवी दिल्ली :** जगात सध्या अनेक देशांमध्ये परस्पर वाद आहेत. रशिया आणि युक्रेन यांच्यात गेल्या अनेक महिन्यांपासून युद्ध सुरु आहे. ज्यामध्ये आतापर्यंत दोन्ही देशांमधील हजारो लोकांचा मृत्यू झाला आहे. तर, दुसरीकडे इस्रायल आणि हमास यांच्यातदेखील युद्ध सुरु आहे. त्यातच आता भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने इराण आणि इस्रायलमध्ये प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी सूचना दिल्या आहेत. दरम्यान, पुढील सूचना मिळेपर्यंत सर्व भारतीयांना इराण किंवा इस्रायलला न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**विकणे आहे**
अलिबाग रेवदंडा
Highway Touch
Village Bagmala
येथे २८ गुंठे बागायत (वाडी)
प्लॉट विकणे आहे.
संपर्क : ७०४५००६५७३

### शेतकऱ्यांच्या जमिनी कमी दरात घेऊन चढ्या भावात विकणारे

# तटकरे जमिनींचे दलाल



। पेण । प्रतिनिधी । बाळगंगा प्रकल्प सुनील तटकरेंमुळेच बंद पडला, अशी घणाघाती टीका शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केली. रायगड लोकसभा मतदारसंघाचे इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचाराची पहिली बैठक पेण तालुक्यातील तुळसी हॉटेल येथे शुक्रवारी (दि. १२) पार पडली. यावेळी आ. पाटील यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. तटकरे जलसंपदा मंत्री असताना हा प्रकल्प बंद पडला असल्याने त्यांच्याकडे पेणकरांजवळ मत मागण्याची नैतिकता नाही. बाळगंगा हे सिडकोचे धरण असल्याने सिडकोने माझ्या शेतकऱ्यांना पैसे द्यावेत. आज एमएमआरडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जमिनी शासन घेऊ पाहात आहे. आम्हाला जमिनी विकायच्या नाहीत, तर आम्हाला तिसऱ्या मुंबई प्रकल्पामध्ये भागीदारी हवी आहे. तटकरे जमिनी विकत घेतो आणि चढ्या भावाने विकतो. तो जमिनींचा दलाल आहे. त्यामुळे तटकरेंना पेणकर मत देणार नाहीत, याबद्दल माझ्या मनात साशंकताच नसल्याचे सांगत आ. पाटील यांनी तटकरेंचा खरपूस समाचार घेतला.

**पेणमध्ये गीतेंनाच मताधिक्य मिळणार : आ. जयंत पाटील**

तटकरेंनी पेणवर केलेल्या अन्यायाचा पाढा वाचत आ. जयंत पाटील यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यात जास्त अन्याय पेणकरांवर केला आहे. त्यामुळे सर्वाधिक मताधिक्य पेणमध्ये गीतेंना मिळणार, यात काहीच शंका नाही. बाळगंगा धरण कोणामुळे बंद पडले? याचे उत्तर एकच- बाळगंगा धरण तटकरेंमुळे बंद पडले. बाळगंगाची मूळ किमतीपेक्षा दीडशे टक्के किंमत




वाढवून प्रकल्प बंद पडले. मूळ किंमत ३६८ कोटी ती १,२२० कोटींवर गेली आणि बाळगंगा धरणाचे काम बंद पडले. त्यावेळेला जलसिंचन मंत्री कोण होते? त्यामुळे पेणकरांजवळ मत मागण्याची नैतिकता तटकरेंजवळ नाही.

पुढे आ. जयंत पाटील यांनी सांगितले की, २५ वर्षे मी अनंत गीते जिल्हा नियोजनाच्या •› पान २ वर

### जो गुरुंचा झाला नाही, तो तुमचा काय होईल : अनंत गीते

रायगड लोकसभा मतदारसंघाचे इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांनी सुनील तटकरे यांच्यावर चौफेर फटकेबाजी केली. जो माणूस आपले गुरुतुल्य असलेले बॅ. अतुंलेसाहेब ज्यांनी राजकारणाचे बारसे घातले आणि ज्या पवारसाहेबांनी राजकारणात भरभरून दिलं, त्यांचा झाला नाही, तर सर्वसामान्य जनतेचा काय होईल, अशी टीका केली. आजपर्यंत रायगडमध्ये नीच आणि गलिच्छ राजकारण सुनील तटकरे यांनी केल्याचेही ते म्हणाले. बॅ.ए.आर अंतुले, शरद पवार, जयंत पाटील, मधुकर ठाकूर यांच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्या या पाप्याला रायगडमधून हद्दपार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा गीतेंनी दिला.

## आज इंडिया आघाडीच्या सभांचा धडाका

- आ. जयंत पाटील, अनंत गीतेंची प्रमुख उपस्थिती
- मेळाव्यातून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीकडून उद्या शनिवार, दि. १३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता अलिबाग तालुक्यातील पांडवादेवी येथील जय मंगल कार्यालय येथे तर दुपारी ३ वाजता चोंढी-आगरसुरे येथील राऊत मंगल कार्यालय, तसेच सायंकाळी ६ वाजता मुरुड तालुक्यातील बोर्लीमांडला येथे कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील, इंडिया आघाडीचे उमदेवार माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात इंडिया आघाडीच्या वतीने अनंत गीते उभे राहिले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून जिल्ह्यातील अनेक भागात प्रचार सुरु आहे. या प्रचाराला कार्यकर्त्यांसह मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. इंडिया आघाडीच्या वतीने अलिबाग तालुक्यातील पांडवादेवी येथील जय मंगल कार्यालय येथे सकाळी अकरा वाजता कार्यकर्ता मेळावा होणार आहे. यावेळी शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, उमेदवार अनंत गीते कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. यावेळी शेतकरी कामगार पक्षासह इंडिया आघाडीचे हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर मुरुड तालुक्यातील आगरसुरे येथील राऊत मंगल कार्यालय व बोर्ली मांडला येथे मेळावा होणार आहे. या मेळाव्याला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील व इंडिया आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.




**आजचा अग्रलेख**
**बाबा रामदेव, बाबा मोदी**

**वे|ध|क**

### वेश्याव्यवसाय करणाऱ्यांवर गुन्हा

**पनवेल :** आफ्रिकन महिलांमार्फत चालवल्या जाणाऱ्या वेश्याव्यवसायावर पोलिसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी तीन महिलांवर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर पोलिसांच्या पथकाने छापा टाकून ही कारवाई केली.

खारघर सेक्टर १२ ई येथील रो हाऊसमध्ये आफ्रिकन महिलांमार्फत वेश्याव्यवसाय केला जात असल्याची माहिती हवालदार विनय तळभंडारे यांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक राजीव शेजवळ यांनी नेमलेल्या पथकाने बनावट ग्राहक पाठवले होते. या बनावट ग्राहकाने त्याठिकाणी जाऊन खात्री केली असता पोलिसांनी छापा टाकला. यावेळी एक आफ्रिकन महिला पोलिसांना चकमा देऊन पळून गेली, तर दोन महिला हाती लागल्या. त्यांच्यावर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आफ्रिकन महिलांनी राहण्यासाठी रो हाऊस भाड्याने घेऊन त्यामध्येच वेश्याव्यवसाय सुरू केला होता.

## अलिबाग, कर्जतमध्ये हंडाभर पाण्यासाठी मैलभर वणवण

### वेलशेत, आंबेघरमध्ये पाण्याचा दुष्काळ

**प्रमोद जाधव**
। अलिबाग ।

वाढत्या तापमानामुळे धरणांमधील पाण्याची पातळीदेखील कमी होऊ लागली आहे. त्यामुळे पाणीटंचाईची समस्या निर्माण होऊ लागली आहे. रोहा तालुक्यातील वेलशेत व आंबेघर गावातील पाच हजार नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. एमआयडीसीमार्फत मिळणाऱ्या पाण्यासाठी पंधरा-पंधरा दिवस वाट पाहावी लागत आहे.

रोहा तालुक्यातील वेलशेत व आंबेघर या गावांना एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. नागोठणे येथे उभारण्यात आलेल्या रिलायन्स प्रकल्पाला हा पाणीपुरवठा होतो. त्यानंतर कंपनीकडून वेलशेत येथील गावातील मोठ्या पाण्याच्या टाकीमध्ये पाण्याचे वितरण केले जाते. तेथून वेलशेत व आंबेघर या दोन गावांना पुरवठा होतो. या गावांचा विस्तार दिवसेंदिवस होत असताना नोकरी व्यवसायानिमित्त कंपनीत येणारे अनेकजण या गावांमध्ये राहात आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे या गावांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. पंधरा-पंधरा दिवस पाण्यासाठी नागरिकांना वाट पाहावी लागत आहे. त्यात काही नागरिकांना पाणी विकत आणावे लागत आहे.

**पाच हजार नागरिकांना करावी लागते कसरत**



वेलशेत व आंबेघरमधील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी जिल्हा परिषद ग्रामीण पुरवठा विभागाकडून एक कोटीहून अधिक रुपयांची जलजीवन मिशन योजना राबविण्यात आली. पाण्याची टाकीसह पाईपदेखील जोडण्यात आले आहे. मात्र, अजूनही या गावांना योजनेतून पाण्याचा थेंबही उपलब्ध झाला नाही. ज्या कंपनीच्या भरोवशावर पाणी मिळण्याची आशा आहे, त्याकडूनही पाणी मिळत नसल्याचा आरोप गंगाराम मिनमीने यांनी केला आहे.

कवडीमोल भावाने प्रकल्पासाठी जमिनी देऊनही आंबेघर, वेलशेत गाव •› पान २ वर

### दोन वाड्या, तीन गावांना टँकरने पाणी



। नेरळ । संतोष पेरणे ।

कर्जत तालुक्यात पिण्याची पाण्याची टंचाई उन्हाळा सुरू झाला की तात्काळ जाणवू लागते. दरवर्षी खासगी टँकरच्या माध्यमातून पाणीटंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा होत असतो. यावर्षी निवडणूक आचारसंहिता असल्याने राजकीय पक्षांना पिण्याच्या पाण्याची सुविधा पुरविण्यात अडचणी येत आहेत. मात्र, पाणीटंचाई वाढू लागल्याने यावर्षी टंचाईग्रस्त भागातील जनतेचे हाल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तालुक्यातील तीन गावे आणि दोन आदिवासी वाड्यांना सरकारी टँकरच्या माध्यमातून पिण्याचे पाणी पुरवले जात आहे.

सध्या कर्जत तालुक्यात शासनाच्या एका टँकरमधून पिण्याचे पाणी टंचाईग्रस्त भागाला पुरविले जात आहे. एप्रिल महिना सुरू झाल्यानंतर स्थानिक ग्रामपंचायतीच्या मागणीनंतर आशाने गावासाठी पहिला •› पान २ वर

## माजी सभापतींवर जीवघेणा हल्ला

। अलिबाग । प्रतिनिधी ।

नवखारहून मोरपाडा येथे जात असताना भाजप कार्यकर्त्यांनी पंचायत समितीच्या माजी सभापतींवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात तो इसम जखमी झाला आहे. याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, पोलिसांकडून ठोस कारवाई न केल्याने नाराजीचे सूर उमटत आहेत. मारहाण करणारी मंडळी दिलीप भोईर यांचे समर्थक असल्याचा दावा प्रकाश पाटील यांनी केला आहे. मात्र, मारण्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

प्रकाश चंद्रसेन पाटील असे या पदाधिकाऱ्याचे नाव असून गेल्या अनेक वर्षापासून ते शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ता म्हणून काम करीत आहेत. अलिबाग पंचायत समितीचे •› पान २ वर



- मांडवा सागरी पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात गुन्हा
- ठोस कारवाई करण्यास टाळाटाळ

## शिक्षकांना ३८ दिवस उन्हाळी सुट्टी

- ७ मे रोजी निवडणूक कर्तव्यावर
- १५ जूनपासून उघडणार शाळा

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेसह महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षा याच आठवड्यात संपणार आहेत. त्यानंतर शिक्षकांना ५ मेपर्यंत शाळेत यावे लागणार आहे. तर लोकसभा निवडणुकीमुळे शिक्षकांना ८ मेपासून उन्हाळी सुट्या लागतील. यंदा शिक्षकांना ३८ दिवसांची उन्हाळी सुट्टी मिळणार आहे.२०२३-२४च्या शैक्षणिक वर्षातच इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र परीक्षा घेतली जात आहे. त्यात दोन्ही इयत्तेतील विद्यार्थ्यांना या परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची पुन्हा एका महिन्यानंतर परीक्षा घेतली जाईल. त्यावेळी पण एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याला पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. सरसकट पास करण्याची पद्धत इयत्ता पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांसाठी आता बंद झाली आहे.

दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपल्या आहेत, त्यांना उन्हाळी सुट्टी लागली आहे. ज्या शाळांच्या परीक्षा झालेल्या नाहीत, •› पान २ वर

**ठळक बाबी...**
- एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात संपणार परीक्षा
- निवडणुकीमुळे ८ मेपासून उन्हाळी सुट्या
- १ मे रोजी विद्यार्थ्यांना मिळणार निकालपत्र
- १५ जूनपासून पुन्हा सुरु होतील शाळा
- दोन दिवस तयारीसाठी यावे लागणार शाळेत

> २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील उन्हाळी सुट्ट्या शाळांना ६ मेपासून लागणार आहेत, पण लोकसभा निवडणुकीसाठी ७ मे रोजी मतदान असल्याने ८ मेपासून सुट्या लागतील. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षा या आठवड्यात संपतील. त्यांच्या परीक्षा सकाळच्या सत्रात घेतल्या जात आहेत.
>
> – पुनिता गुरव, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

## खा. बारणेंकडून चिकनची मेजवानी?

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि.१२) पनवेल विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या घटक पक्षातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्याचे आयोजन आकुर्ली येथील काकाजीनी वाडी येथे करण्यात आले होते. यावेळी उपस्थित शेकडो पदाधिकाऱ्यांसाठी खास चिकनची मेजवानी ठेवण्यात आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या मेळाव्याची विशेष चर्चा परिसरात होती.

श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ मेळाव्यासाठी उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या जेवणासाठी शेकडो कोंबड्यांचा बळी देत करण्यात आलेल्या चिकन बिर्याणीच्या बेताचीच सर्वत्र चर्चा होती. खासदारकीच्या मागील कार्यकाळात मतदारसंघातील कार्यकर्त्यांशी कोणताही संपर्क न ठेवल्यानेच चिकनचा बेत आखून कार्यकर्त्यांना खुश करण्याचा प्रयत्न बारणे करत असल्याची चर्चा दबक्या आवाजात यावेळी कार्यकर्ते करत होते. काही असले तरी कार्यकर्त्यांनी मात्र मनसोक्तपणे चिकन बिर्याणीवर ताव मारल्याचे बोलले जात आहे.

### लोकसभेसाठी प्रशासनाची 'हायटेक' यंत्रणा

## ११ ॲप्समधून निवडणुकीवर नजर


**सुयोग आंग्रे**
। रायगड ।

समाजमाध्यमांच्या वापरासह विविध हायटेक ॲप वापरण्याकडे नागरिकांचा मोठ्या प्रमाणात कल वाढला आहे. हाच धागा पकडत यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मतदारांसह उमेदवारांसाठी विविध ॲप्सची निर्मिती केली आहे. ॲपच्या माध्यमातून उमेदवाराला आपले नामनिर्देशन पत्र दाखल करण्यापासून ते प्रमाणपत्र मिळेपर्यंत सर्व इत्थंभूत माहिती मिळणार आहे. प्रचार सभेसाठी आवश्यक असलेल्या परवानग्यांसाठी एक खिडकी योजनेसह सुविधा ॲपची निर्मिती केली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनालादेखील उमेदवारांची व त्यांना आवश्यक असलेल्या विविध परवानग्यांसाठी त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची माहिती एका क्लिकवर मिळणार आहे.

लोकसभा, विधानसभा अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या काळात उमेदवारी अर्ज दाखल करणे, प्रचार वाहनाच्या परवानग्या, सभेसाठी जागेची परवानगी, यासह विविध परवानग्यांसाठी पूर्वी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात पायपीट करावी लागत असे. तसेच या परवानग्या घेताना वेळ व मनुष्यबळ अधिक खर्ची पडत होते. या सर्व बाबींचा विचार करता, सध्याच्या घडीला समाजमाध्यमांसह तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. त्यामुळे निवडणूक आयोगानेदेखील यंदाच्या लोकसभा निवडणुकीत तंत्रज्ञांचा अधिक वापर करण्याचा निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे. तसेच आता ही प्रक्रिया सोपी करणे व मनुष्यबळावरचा ताण कमी करण्यासाठी निवडणूकविषयक विविध ॲपची निर्मिती केली आहे. या ॲपमुळे मनुष्यबळावरील ताण कमी होणार आहे. तसेच वेळ वाचण्यास मदत होणार आहे. दरम्यान, यंदाच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे, यामुळे मनुष्यबळावरील ताण कमी होण्यास मदत होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

**ईव्हीएम मॅनेजमेंट सिस्टम**

या यंत्रणेच्या माध्यमातून ईव्हीएमयंत्र आणि व्हीव्हीपट यंत्र याच्या माहितीबरोबर मतदान केंद्रांवरील मतदान प्रक्रिया पारदर्शक पार पडण्यास मदत करते.



**एन्कोर ॲप**

उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने नामनिर्देशन पत्र, प्रतिज्ञापत्र सादर करण्याची सुविधा दिली आहे. निवडणूक निर्णय •› पान २ वर

## आनंद महाराज खंडागळे निवर्तले

। रसायनी । वार्ताहर ।



प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. आनंद महाराज खंडागळे यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांच्या राहत्या घरी श्रीनाथ आश्रम चौक येथे गुरुवार, दि. ११ एप्रिल रोजी सायंकाळी निधन झाले.

कै. आनंद महाराज खंडागळे यांनी आपलं आयुष्य अध्यात्माच्या प्रचार, प्रसारासाठी अर्पण केलं. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी जनसामान्यांचं प्रबोधन केलं. रोखठोक वाणी आणि शुद्ध विचार हे आनंद महाराज खंडागळे यांचं मुख्य स्रोत होतं. महाराजांना महंत, महाराष्ट्र भूषण, कीर्तन केसरी, रायगडभूषण, समाजभूषण अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

आनंद महाराज खंडागळे यांच्या घरी शेकडो वर्षांपासून वारकरी सांप्रदायाची परंपरा आहे. त्यांनी स्वतः व त्यांचे सर्व भक्तगण यांचा ५० वर्षांहून अधिक सद्गुरु माऊली सेवा मंडळ केंद्र चौक, मुंबईसह कोकण विभाग अशी माऊलींची पायी दिंडी आळंदी सोहळा व पंढरपूरचा सोहळा नित्यनेमाने सुरू आहे.

विठ्ठलाचे कीर्तन आणि ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा यावर आनंद महाराजांनी आपलं आयुष्य अर्पण केलं. महाराजांचं कीर्तन ऐकण्यासाठी जिल्ह्यातून नव्हे तर, राज्यातून भक्त जमत होते. अलीकडे वय झाल्यामुळे आनंद महाराज कीर्तनासाठी उभे राहात नव्हते. त्यांची ही परंपरा त्यांचा मुलगा ह.भ.प. चैतन्य महाराज खंडागळे पुढे नेत आहे. त्यांच्या निधनामुळे अवघ्या महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय परंपरेतील लाखोंच्या समुदायावर शोककळा पसरली आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी व एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर चौक येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या अंतिम दर्शनाला हजारोंच्या संख्येने वारकरी संप्रदाय, त्यांचे शिष्यगण, अनेक कीर्तनकार, गायनाचार्य, मृदुंगमणी, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मंडळी आणि समस्त वारकरी संप्रदाय राज्यातून, जिल्ह्यातून तसेच गावागावातून उपस्थित होता.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**कै. पंढरीनाथ विष्णू घरत, ८९ वी जयंती, अलिबाग**



**श्रीमती मालती कमळाकर पाटील, वाढदिवस, अलिबाग**



**देविकाबेन नरशीभाई दिवाणी पटेल, स्मरणार्थ, ठाणे**

# कांदळे ग्रामस्थांचा निवडणुकीवर बहिष्कार

**। पेण । प्रतिनिधी ।**

**कांदळेपाडा ग्रामस्थांनी आगामी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय एकमुखाने घेतला असून, प्रांताधिकाऱ्या निवेदन दिले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची अपूर्ण कामांबाबत वारंवार पाठपुरावा करुनही संबंधित प्रशासनाने चालढकलपणा चालविला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, परिसरातील महिला ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन गुरुवारी रात्री उशिरा मा. सरपंच मुरलीधर भोईर यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन केले होते. दरम्यान, प्रशासनाच्या दुर्लक्षितपणावर संताप व्यक्त केला.**



कांदळे, गावालगत तसेच कांदळेपाडा व उचेडे या गावाच्या मधून राष्ट्रीय महामार्ग जात आहे. या महामार्गाचे काम कांदळे, कांदळेपाडा व उचेडे हद्दीतील जवळ-जवळ पूर्ण झाले असून, आता काँक्रिटीकरणसुद्धा चालू आहे. परंतु, त्याच महामार्गाच्या बाजूला असणाऱ्या या गावांना जोडणारे सर्विस रस्त्यांचे व त्या सर्विस रस्त्याला लागून असणारी गटारे अपूर्ण ठेवण्यात आली असून, ग्रामस्थांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. कांदळेपाडा गावाच्या बाजूनी वडखळकडे जाणाऱ्या सर्विस रस्त्याचे काम अजून प्रलंबितच आहे. त्यामुळे कांदळेपाडाच्या बाजूनी पुढे रस्ता नसल्याने भोगद्यातून जाताना पुष्पक हॉटेलपर्यंत मोठ मोठे खड्डे व ठिकठिकाणी पेव्हर ब्लॉक निघाल्यामुळे वारंवार अपघात होत आहेत. त्यामुळे

## ■ प्रांताधिकाऱ्यांना दिले निवेदन

वडखळ व स्थानिक परिसरातील तरुणांचे नाहक बळी जात आहेत, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

गेली पाच ते सहा वर्षांपासून पाठपुरावा करुनदेखील हॉटेल पुष्पक ते हॉटेल साईलिलापर्यंतचा सर्विस रोड व सर्विस रोडच्या दोन्ही बाजूची गटारे अपूर्ण स्थितीतच आहेत. तसेच जुन्या रस्त्यालगत असणारी जीवन प्राधिकरणची मुख्य जलवाहिनी या रस्त्याचे काम करत असताना रस्त्यात गेली असून, तिला वारंवार गळती लागत आहे. त्यामुळे दोन-दोन दिवस पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. तसेच नाल्यांना असणारे संरक्षण भिंत, जुने गणपती विसर्जन घाट, आमच्या उचेडे शाळेची संरक्षण भिंत व शेतकऱ्यांच्या शेतीचे पाणी जाण्याचा मार्ग या कामांकडे पूर्ण दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे अपूर्ण कामांचा व येत्या पावसाळ्याचा विचारकरिता पुन्हा एकदा कांदळेपाडा व कांदळे गावात पुराचे पाणी जाणार व त्याचा त्रास आम्हा ग्रामस्थांना होणार यात शंकाच नाही. सदरील महामार्गालगत ज्या अपूर्ण कामांबाबत आम्ही ग्रामस्थ वारंवार ग्राम पंचायत कांदळेकडे विचारणा करीत आहोत. त्यानुसार त्यावर ग्रामपंचायत कांदळे यांनी संबंधितांकडे पत्रव्यवहार केल्याचे सांगत असून, याबाबत संबंधित ठेकेदार व प्रशासन केलेल्या पत्रव्यवहार व तोंडी तक्रारीकडे दुर्लक्ष करीत आहे. तरी अपूर्ण कामे निवडणुकीच्या अगोदर पूर्ण करण्याबाबत प्रशासकांनी योग्य ती कार्यवाही केली नाही तर कांदळे, कांदळेपाडा व उचेडे ग्रामस्थ मतदानावर बहिष्कार टाकल्याशिवाय गप्प बसणार नाहीत, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## पनवेलमध्ये रामजन्मोत्सव

**। पनवेल । वार्ताहर ।**

श्री बल्लाळेश्वर व श्री रामजी संस्थान पनवेल यांच्या वतीने रामनवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्ताने श्रीराम संकीर्तन त्रिदल (तीन दिवसीय रामकथा), दि. १४, १५, १६ एप्रिल रोजी सायं. ६ ते ८ वा. श्रीराम कथामृत, दि. १७ एप्रिल, सकाळी ११ वा. श्रीराम जन्माख्यान व दि. १७ एप्रिल रोजी रात्रौ ९ वा. पालखी तसेच दि. १८ एप्रिल, सायंकाळी ६ वा. लळिताचे कीर्तन सादरकर्ते ह.भ.प. नंदकुमार कर्वे, साथसंगत हार्मोनियम : महेश घाटे, तबला : वेदांत पाटील असणार आहेत. तरी, भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री बल्लाळेश्वर व श्री रामजी संस्थानचे विश्वस्त यांनी केले आहे.

# चायनीज सेंटरवर बेकायदा मद्यविक्री

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल परिसरातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी शहरातील रस्त्यालगत, चौकांमध्ये आणि इतर मोक्याच्या ठिकाणच्या जागा चायनीजसह खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी बळकावल्याचे चित्र दिसून येत आहे. रात्र होताच रस्त्यावर फास्टफूड विक्रेते, चायनीज सेंटर यांच्या गाड्या लागत आहेत. पहाटेपर्यंत चालणाऱ्या या हातगाड्यांवर होणाऱ्या गर्दीत रस्तादेखील अडवला जात आहे. तसेच या ठिकाणी मद्यविक्रीसुद्धा करण्यात येत असल्याने अशा फेरीवाल्यांवर पोलिसांसह महापालिकेच्या पथकानेही कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.

महापालिका अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे शहरात अनधिकृत फेरीवाल्यांचा शिरकाव झाला आहे. शहरातील, शहराबाहेरील व्यक्तींकडून दिवसा, रात्री हातगाड्या मांडून, पदपथावर ठाम मांडून व्यापार केला जात आहे. त्यात उघड्यावर खाद्यपदार्थ विकणाऱ्यांचीही मोठी भर पडली आहे.


(संग्रहित)

रस्त्यांवरच सिलिंडर मांडून खाद्यपदार्थ शिजवून विकले जात आहेत. त्यामध्ये फास्टफूड, चायनीज, तसेच इतर खाद्यपदार्थ विक्रेत्यांचा समावेश आहे. यामुळे सिलिंडरच्या स्फोटाच्या, आगीच्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय उघड्यावर शिजवल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांमुळे आरोग्याचाही प्रश्न निर्माण होत आहे, त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी बेकायदा मद्य विक्रीसुद्धा सर्रास सुरु आहे. काही गाळ्यांमध्येसुद्धा चायनीज सेंटरमध्ये विनापरवाना मद्य विक्री होत असल्याने या चायनीज गाळ्यावर राज्य उत्पादन शुल्क पथकाने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# तालुक्यात ‘स्वीप’ अंतर्गत जनजागृती

## तहसीलदार घोरपडे यांच्या नियोजनातून कार्यक्रम

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी पोलादपूर तालुक्यातील ५१ मतदान केंद्रांवर ‘स्वीप’ कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती कार्यक्रमांचे नियोजन पोलादपूरचे तहसीलदार कपिल घोरपडे यांनी केले आहे. २७ मतदान केंद्रांवर आतापर्यंत मतदार जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील ५१ पैकी २७ मतदान केंद्रांमध्ये ‘स्वीप’ कार्यक्रमांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी मतदार जनजागृती




कार्यक्रमाचे नियोजन केले असून, शिक्षण विभाग, एकात्मिक बाल विकास प्रकल्प व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत चित्रकला स्पर्धा, सायकल रॅली, रांगोळी स्पर्धा, पथनाट्य, महिला मेळावा, गृहभेटी आणि प्रभातफेरी आदी उपक्रम या कार्यक्रमातून राबविले जात आहेत.

पोलादपूर तालुक्यातील सवाद १ व सवाद २, धारवली, कामथे, कालवली, लोहारे १ व लोहारे २, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खुर्द, तुर्भे खोंडा, गोवेले, वझरवाडी, पोलादपूर १, पोलादपूर २, पोलादपूर ३, पोलादपूर ४, पोलादपूर ५, पोलादपूर ६, काटेतळी, सडवली, रानवडी बुद्रुक, बोरावळे १, बोरावळे २, घागरकोंड, साखर, उमरठ, ढवळे, करंजे, देवळे, वाकण १, वाकण २, कापडे बुद्रुक १ व कापडे बुद्रुक २, धामणदिवी, महाळुंगे, केवनाळे, रानकडसरी, दाभिळ, कापडे खुर्द, देवपूर, भोगाव खुर्द, चांभारगणी बुद्रुक, निवे, पैठण, महारगूल, परसुले, कोतवाल खुर्द, कोतवाल बुद्रुक, कुडपण बुद्रुक, पळचिल या ५१ केंद्रांमध्ये ४ ते २० एप्रिलपर्यंत ‘स्वीप’ कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार कपिल घोरपडे यांनी दिली.

## जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुका बौध्द समाज सेवा संघाच्या अधिपत्याखाली तालुक्यातील तमाम बौध्द समाजातर्फे रविवार, दि.१४ एप्रिल रोजी दरबार हॉल, मुरुड येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३३ वा तालुकास्तरीय जयंती महोत्सव सादर करण्यात येणार आहे. यानिमित्त भव्य बाईक रॅली, महाराष्ट्रातील सुप्रसिध्द युवा वक्ता सुमेध भालेराव संगमनेरकर यांचे क्रांतिकारी व्याख्यान व प्रबोधनात्मकपर संगीत बहार या ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे हे ५९ वे वर्षे असून, मुरुड तालुक्यातील एकूण २२ गावांतील बौध्द बांधव व भगिनी बहुसंख्येने एकत्र येऊन दरवर्षी जयंती महोत्सव व त्यानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे सातत्याने आयोजन करतात. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या ऐतिहासिक मुरुड-जंजिरा शहरात, तालुक्यातील बौध्द समाजाच्या गेले ४५ वर्षांच्या प्रलंबित मागणीनुसार, तालुक्यात उभारण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारक इमारतीचे बांधकाम यावर्षी प्रगतीपथावर असल्याने तालुक्यातील तमाम बौध्द समाजात आनंदाचे वातावरण आहे, अशी माहिती संस्थेचे तालुका सचिव धर्मेश मोरे यांनी दिली.

# तुमचा महाराष्ट्राशी काय संबंध?

## ■ मोदींच्या नकली शिवसेनेच्या टीकेला उद्धव ठाकरेंचं प्रत्युत्तर



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शिवसेना नकली असायला ती तुमची डिग्री आहे का?, असा खोचक सवाल ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात प्रचारसभेत उद्धव ठाकरेंवर निशाणा साधताना त्यांच्या नेतृत्वातील शिवसेनेला नकली शिवसेना म्हटलं होतं. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीदेखील नकली शिवसेना म्हणत ठाकरे गटाला हिणवलं होतं. या दोन्ही नेत्यांच्या टीकेला शुक्रवारी (दि. १२) उद्धव ठाकरे यांनी सडेतोड शब्दांत प्रत्युत्तर दिलं आहे. उद्धव ठाकरे यांची बोईसरमध्ये सभा पार पडली. या सभेत त्यांनी भाजपवर सडकून टीका केली.

आता निवडणुकांचे वारे वाहत आहेत. गद्दारांचे दोन मालक महाराष्ट्रात फिरत आहेत. कोण गद्दार आणि कोण मालक हे तुम्हाला माहिती आहे. सरळ उघड सांगतो. कारण, परवा मी पत्रकार परिषद घेतली त्यामध्ये सांगितलं की, यापुढे मी जी टीका करणार आहे ती देशाचे पंतप्रधानांवर नाही, तर भाजपच्या नरेंद्र मोदींवर करणार आहे. मी देशाच्या पंतप्रधानांचा कधीच अपमान करणार नाही. एकतर तुमचा महाराष्ट्राशी काय संबंध? तुम्ही महाराष्ट्राच्या बाहेरचे आहेत, अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

### ठाकरेंचं अमित शाहांही प्रत्युत्तर

**शिवसेनाप्रमुखांनी महाराष्ट्राच्या भूमीपुत्रांसाठी शिवसेना स्थापन केली, शिवसेनेला जन्म दिला. त्या शिवसेनेला तुम्ही नकली म्हणता? अरे नकली शिवसेना म्हणायला ती काय तुमची डिग्री आहे का? पण आहे. मग त्यांचे दुसरे पार्टनर आले. खंडणीखोर पक्षाचे दुसरे नेते अमित शाह आले. ते बोलून गेले, शिवसेना नकली आहे. ज्या पद्धतीने त्यांनी आपले गद्दार फोडले. ईडी, सीबीआय, इनकम टॅक्सची बंदूक त्यांच्या डोक्यावर लावली आणि घेऊन गेले. इथूनच ते पालघरमधून सूरतला घेऊन गेले, असा घणाघात उद्धव ठाकरेंनी केला**

### मिंधेंची दाढी सचळाचळा कापते

**शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार म्हणून कांगावा केला जातो. पण त्यांचे विचार नेमके कोण ऐकतंय? मिंधे माईकवर जे काही कुंतात ते बाळासाहेबांचे विचार नाहीत. अरे शिवसेनेचा दरारा काय आहे, एक फोन बाळासाहेबांनी केला तर दिल्लीतील लोकं चळाचळा कापायचे. आता दिल्लीतला फोन आला तर मिंधेंची दाढी सचळाचळा कापते. हे शिवसेनेचे विचार?, असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला.**

## पान १ वरून

## तटकरे जमिनींचे दलाल

बैठकीमध्ये एकत्र येतो. पंतप्रधान सडक योजनेंतर्गत सर्वात जास्त निधी अनंत गीते यांनी वापरला आहे. गेल्या निवडणुकीत पवारसाहेबांच्या सांगण्यावरुन मी मदत केली. परंतु, त्याची पतफेड कशी केली, ती सर्व रायगडकरांना माहीत आहे, त्यामुळे मागच्या निवडणुकीत केलेली चूक दुरुस्त करणार आहे, रायगडकर इतिहास घडवतील आणि तटकरेला हद्दपार करतील, असेही ते म्हणाले.

या सभेचे प्रास्ताविक माजी जि.प. सदस्य सुरेंद्र म्हात्रे यांनी केले, तर अतुल म्हात्रे, प्रशांत पाटील, अशोक मोकल यांनीदेखील आपले मनोगत मांडले. यावेळी व्यासपीठावर माजी जि.प. सदस्य शेकाप महादेव दिवेकर, शिवसेना संपर्क प्रमुख विष्णुभाई पाटील, जि.प. सदस्य किशोर जैन, शेकापचे शिक्षणमहर्षी पी.डी. पाटील, काँग्रेसचे अशोक मोकल, प्रवीण पाटील, रायगड जिल्हा संघटीका दिपश्री पोटफोडे, शेकाप पक्षाच्या स्मिता पाटील, अविनाश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. या बैठकीला हमरापूर विभागातील हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. ही बैठक यशस्वी होण्यासाठी तालुका प्रमुख जगदीश ठाकूर, विधानसभा समन्वयक समीर म्हात्रे यांनी मेहनत घेतली.

यावेळी मार्गदर्शन करताना अनंत गीते म्हणाले, श्रीवर्धनच्या सभेत आ. जयंत पाटील यांनी माझी उमेदवारी घोषित केली, त्याचवेळी शरद पवारसाहेब उद्धव साहेबांना म्हणाले मला याला (तटकरेला) गाढायचे आहे आणि त्यासाठी अनंत गीतेच उमेदवार हवाय. जरी माझी उमेदवारी आता जाहीर झाली असली, तरी ही उमेदवारी श्रीवर्धनच्या सभेमध्येच निश्चित झाली होती. पेण तालुक्याने दरवेळेला मला मताधिक्य दिलेले आहे. तिन्ही निवडणुकांमध्ये मला कधीच नाराज केलेले नाही, त्यामुळे सर्वाधिक मतं या चौथ्या निवडणुकीमध्ये मलाच मिळणार यात काही शंकाच नाही, असा विश्वासही गीतेंनी व्यक्त केला.

पुढे अनंत गीते यांनी सांगितले की, भाजपने केलेल्या सर्व्हेनुसार ५०० पैकी १७२ जागा भाजपला मिळणार आहे. यांना २०० चाही आकडा पार करता येणार नाही. म्हणून खोटं बोला, पण रेटून बोला, अशा उक्तीप्रमाणे मोदी अबकी बार ४०० पार असे ओरडत आहेत. देशात मोदींविरुद्ध त्सुनामी येणार आणि देशाचे पंतप्रधान हे राहुल गांधीच होणार, असेही ते म्हणाले.

## वेलशेत, आंबेघरमध्ये पाण्याचा दुष्काळ

पाण्यापासून वंचित असल्याचे मिनमिने यांनी सांगितले. रिलायन्स कंपनीने गावाला पाणीपुरवठा करावा, अशी मागणी ग्रामपंचायतीनेदेखील केल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, एमआयसीडीकडून कंपनीला आणि कंपनीकडून गावांना पाणीपुरवठा केला जातो. फक्त पाच वर्षांसाठीच पाणीपुरवठा करण्याबाबत निर्णय होता. तरीदेखील गावासाठी पाणी दिले जात आहे. पाणीपुरवठा व्यवस्थित होत असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

पाणीकपातीची सूचना फक्त ग्रामपंचायत कार्यालयापुरती

अलिबाग तालुक्यातील उमटे धरणाने तळ गाठण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत जानेवारीपासून पाणीकपातीला सुरुवात केली आहे. सुरुवातीला एक दिवसआड, त्यानंतर गेल्या पंधरा दिवसांपूर्वी दोन दिवसआड आता गेल्या दहा दिवसांपासून तीन दिवसआड असा पाणीपुरवठा केला जात आहे. ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत ग्रामपंचायतीला याबाबत सूचना पत्र देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, पाणीकपातीच्या सूचनांचे पत्र ग्रामपंचायत कार्यालयापुरतेच असल्याच्या तक्रारी अनेक गावांतील नागरिकांकडून केल्या जात आहेत. तीन दिवसआड पाणीपुरवठा होणार असल्याची अगोदर माहिती काही ग्रामपंचायतींकडून मिळत नसल्याने गावांतील नागरिकांना पाण्याच्या प्रतिक्षेत राहावे लागत असल्याचे बोलले जात आहे. ज्यावेळी ग्रामस्थ विचारणा करतात, त्यावेळीच ही माहिती मिळते, असा आरोप अनेक नागरिकांकडून केला जात आहे.

## माजी सभापतीवर जीवघेणा हल्ला

ते माजी सभापती आहेत. सोमवारी रात्री रांजणखार डावली (नवखार) येथून ते त्यांच्या गाडीतून मोरापाडा येथे त्यांच्या घरी जात होते. रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास पाण्याच्या टाकीच्या पुढे महेंद्र पाटील यांनी पिकअप गाडी आडवी टाकली. त्यावेळी दोघांमध्ये शाब्दीक वाद झाला. हा वाद विकोपाला पोहोचला. पिकअपमधून अन्य मंडळींनी येऊन प्रकाश पाटील यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. त्यांना शिवीगाळी करून धक्काबुक्की करण्याबरोबरच लोखंडी रॉडने गंभीर दुखापत केली.

याप्रकरणी फुफादेवी पाडा येथील महेंद्र पाटील, रांजणखारमधील सोपान पाटील, श्रीधर पाटील, कांचना पाटील, नागेश पाटील, सुधा पाटील दमयंती पाटील या सात जणांविरोधात मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होऊन अनेक दिवस उलटूनही मांडवा पोलिसांनी मारेकऱ्यांविरोधात ठोस कारवाई केली नसल्याने पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## ११ ॲप्समधून निवडणुकीवर नजर

अधिकाऱ्यांना आलेले उमेदवारी अर्ज स्वीकृत, अस्वीकृत करणे, झालेल्या मतदानाची माहिती संकलित करणे इत्यादी कामे या ॲपमार्फत केली जाणार आहेत.

**सिव्हिजिल ॲप**

निवडणुकीदरम्यान काही अनियमितता आढळून आल्यास नागरिक या ॲपद्वारे त्या प्रकरणाचा संदेश, फोटो, व्हिडीओ शेअर करू शकतात. यात तक्रारदाराची ओळख जाहीर होत नाही. तक्रार प्राप्त झाल्यापासून १०० मिनिटांच्या आत तक्रारीचे निवारण केले जाते.

**क्नो युअर कॅन्डिडेट्स**

उमेदवाराची गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता इत्यादी माहिती नागरिकांना उपलब्ध होते.

**वोटर हेल्पलाईन ॲप**

मतदार यादीतील मतदाराचे नाव शोधणे, मतदार नोंदणीचे अर्ज दाखल करणे, मतदान केंद्रांची माहिती इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

**इलेक्शन सिझ्युअर मॅनेजमेंट सिस्टीम**

अमली पदार्थ, मद्य, मौल्यवान धातू, रोख रक्कम इत्यादी जप्त केल्यावर डिजिटल पद्धतीने माहिती संकलित केली जाणार आहे.

**सुविधा ॲप**

उमेदवारांना निवडणूक कालावधीत निवडणूकविषयक विविध परवानगी मिळण्यासाठी उपलब्ध आहे.

**सक्षम ॲप**

दिव्यांग मतदारांना त्यांचे मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी उपयुक्त आहे.

**केवायसी ॲप**

या ॲपद्वारे निवडणुकीमध्ये उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आलेल्या उमेदवारांची चारित्र्य तपासणी आणि गुन्ह्यांची माहिती तातडीने उपलब्ध होणार आहे.

**एनव्हीएसपी पोर्टल ॲप**

या ॲपवर मतदारांना मतदानासंबंधित असणारी सर्व माहिती आणि मतदानाच्या सुविधांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

**ईटीपीबीएस ॲप**

सैन्यदलात कार्यरत असणाऱ्या मतदारांसाठी देण्यात येणाऱ्या पोस्टल बॅलेट पेपर संबंधात हे ॲप काम करणार आहे. सैन्यदलातील मतदारांची मतदान प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी हे ॲप उपयुक्त ठरणार आहे.

**बीएलओ ॲप**

या ॲपला गरुडा ॲप संबोधले जाते. या ॲपवरून मतदान केंद्र अधिकारी त्यांना दिलेल्या कामकाजाची माहिती अद्ययावत करू शकतात.

## दोन वाड्या, तीन गावांना टँकरने पाणी

टँकर शासनाकडून सुरू करण्यात आला होता. त्यानंतर कर्जत तालुक्यातील सर्वात जास्त पाणीटंचाई समस्या जाणवणाऱ्या मोग्रज ग्रामपंचायतीकडून चार ठिकाणी पिण्याचे पाणी टँकरच्या माध्यमातून पुरविण्यात यावे, अशी मागणी ग्रामपंचायतीकडून करण्यात आली. त्यानुसार कर्जत पंचायत समितीच्या पाणीटंचाई निवारण पथकाने तेथील परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर मोग्रज ग्रामपंचायतीमधील धामणी, पिंगळस आणि जांभूळवाडी या तीन ठिकाणी ट्रँकरच्या माध्यमातून पिण्याचे पाणी पुरविण्यात येऊ लागले आहे. सध्या कर्जत पंचायत समितीकडे पाणी टंचाईग्रस्त भागात पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी केवळ एक टँकर जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर केला आहे. सध्या त्या टँकरच्या माध्यमातून एक आदिवासी वाडी आणि तीन गावे या ठिकाणी पिण्याचे पाणी पुरवले जात आहे.तर कर्जत पंचायत समितीकडे मोग्रज ग्रामपंचायतीमधील मेचकर वाडीमधील पिण्याच्या पाण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. तेथील पाहणी भूजल सर्वेक्षणकडून अहवाल आल्यावर शुक्रवारी १२ एप्रिल रोजी तेथेदेखील टँकरमधून पिण्याचे पाणी देण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांनी दिली आहे.

मोग्रज ग्रामपंचायतीमधील खानंद आणि भक्ताची वाडी येथील प्रस्ताव कर्जत पंचायत समितीकडे पोहोचले आहेत. तेथे तालुक्यातील सर्वाधिक पाणीटंचाई उद्‌भवली असल्याने शासनाच्या जलजीवन मिशनमधील नळपाणी योजनांचे काय झाले, असा प्रश्न स्थानिकांना पडला आहे.

## शिक्षकांना ३८ दिवस उन्हाळा सुट्टी

त्यांना चालू आठवड्यात परीक्षा संपविण्याचे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांनी दिले आहेत. विद्यार्थ्यांना सुट्ट्या लागल्या तरी मुख्याध्यापक व शिक्षकांना पुढील शैक्षणिक वर्षीची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. ङ्गआरटीईफ्अंतर्गत २५ टक्के मोफत प्रवेश प्रक्रिया अजून सुरु न झाल्याने शाळांना तोवर उर्वरित ७५ टक्के प्रवेश पूर्ण करून घ्यावे लागणार आहेत. शाळांनी आता त्याची तयारी सुरू केली आहे.

## हनुमान मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील मळेघर गावात बांधण्यात आलेल्या श्री हनुमान मंदिर व मूर्ती प्राणप्रतिष्ठा १४ व १५ एप्रील रोजी आयोजित करण्यात आला असून, दोन दिवस चालणाऱ्या उत्सवात सर्व आबालवृद्धांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

१४ एप्रिल रोजी दुपारी काश्मिरेवाडी येथील पांडुरंग मोकल यांच्या घरातून श्री हनुमानाची मूर्ती वाजत गाजत मळेघर गावात आणण्यात येणार आहे. मळेघर गावात हनुमान मंदिराची नवीन वास्तू तसेच श्रमूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा १४-१५ एप्रिल रोजी संपन्न होणार आहे. सदर सोहळ्यामध्ये धार्मिक विधी, प्रवचन, हरिपाठ, भजन, कीर्तन असे कार्यक्रम होणार आहेत.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकत परिशिष्ठ**

| जमीनमालक नाव | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| मंगल दामु भागीत | ७०/५अ | ०.८.६० | ०.५६ |
| महादु नथु भागीत | ७०/५ब | ०.१०.६० | ०.६९ |
| भगवान गोपाळ पाटील व इतर | ७१/१६ | ०.०९.०० | ०.१७ |
| भगवान गोपाळ पाटील व इतर | ७१/१८ | ०.१३.०० | ०.३१ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा, बोजा, हक्क, हितसंबंध, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारसाहक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत दयावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाहय हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**ॲड. कैलास अनंत बासरे**

पत्ता:१०३,पांडुरंग धाम, नेरळ-मुरबाड रोड
रेल्वे गेट जवळ, नेरळ पुर्व
मो.न ७७९८४३३८८८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन**

मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत.

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे.नं. | हिस्सा.नं. | क्षेत्र हे.ऑर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| सुधाकर परशुराम घारे | ३१ | ९ | ०.२३.५० | ०.२७ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक - १३/०४/२०२४

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ता. ओम श्री भाग्योदय को.ऑप.हौ.सो.
कोतवाल नगर कर्जत, रायगड
मो. नं. ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

निवडक

## भूमापन दिन साजरा

**खोपोली :** खालापूर उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात भूमापन दिन साजरा करण्यात आला. खालापूर उप अधीक्षक शरद काळे यांच्या हस्ते मोजणी साहित्याचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मुख्यालय सहाय्यक उत्तम केंद्रे, शिरस्तेदार समाधान पाटील, निमतानदार पंकज सनांसे, भाऊसाहेब मुंडे, शंकर मोरे, संदीप थोरवे, दिपमाला राजपूत, लिपिक सिद्धेश पावसकर, अभिलेखपाल ऋषिकेश गरड, शिपाई व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## खोपोलीत ईद उत्साहात

**खोपोली :** मुस्लिम धर्मियांचा रमजान ईद हा पवित्र सण आहे.रमजान ईदच्या दिवशी सकाळी खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक शीतल राऊत यांनी पोलीस अधिकाऱ्यांसमवेत शिळफाटा, खोपोली येथील मशिद बाहेर उभे राहून नमाज पठण करून बाहेर येणाऱ्या मुस्लिम बांधवांना गुलाबाचे फुले देत रमजान ईदच्या शुभेच्छा देण्याचा अनोखा कार्यक्रम साजरा करीत सामाजिक सलोखा राखल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## मोफत आरोग्य शिबीर

**पाली :** रोटरी क्लब ऑफ ठाणे ग्रीन सिटी, व सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागडात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन रविवारी (दि.१४) कासारवाडी, नवघर येथे करण्यात आले आहे. या शिबिरात कासारवाडी, जाधववाडी, नवघर, आसरे, फळसुंडे, धोंडिवली, नवघर बौध्दवाडी, आसरे बौद्धवाडी, उंबरवाडी आदिवासी वाडी गावातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मैफलीने जिंकली मने

**कर्जत :** 'गुरू परमात्मा परेशू' या मैफलीत गायकांनी सादर केलेल्या मराठी भक्तीगीते व नाट्यगीतांनी उपस्थित भाविकांची मने जिंकली. कर्जत तालुक्यातील पळसदरी येथील समर्थ मठामध्ये श्री स्वामी समर्थांच्या प्रकटदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राजेंद्र निगुडकर, राजू पोतदार, विक्रांत दरेकर, डॉ.नितीन आरेकर, दिनेश अडावदकर आदी ग्रामस्थ तसेच स्वामी भक्त उपस्थित होते.

## बेळजाई मातेचा वर्धापन दिन

**सुकेळी :** श्री क्षेत्र बाळसई येथील ग्रामदेवता तसेच नवसाला पावणारी अशी महती असलेल्या श्री.आई बेळजाई मातेचा पारंपरिक १० वा वर्धापनदिन सोहळा आज साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचेदेखील आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाची सुरुवात मूर्तीवर दुग्ध अभिषेक व होम हवन करुन होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ४ वा. श्री.बेळजाई मातेच्या मंदिरातून पादुकांची पालखीतून भव्य मिरवणूक सोहळा पार पडेल.

### ठेकेदार बदलला तरीही कामाची समस्या कायम

# इंदापूर बायपासचे तीनतेरा



■ वन, रेल्वेच्या धोरणाचा फटका

### कोकणवासियांमध्ये प्रचंड नाराजी

**कोकणच्या विकासाला अडथळा निर्माण करणाऱ्या महामार्गाचे रुंदीकरण हे महत्त्वाचे आहे. कोकणचे मुख्य प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या इंदापूर–माणगाव या महत्त्वाच्या शहराजवळून जाणाऱ्या बायपासचे तीनतेरा वाजल्याने कोकणवासियांमध्ये प्रचंड नाराजी प्रसरली आहे.**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोकणसह दक्षिणेकडे जोडणारा विकासाचा मार्ग म्हणून मुंबई-गोवा महामार्गाकडे पाहिले जाते. या मार्गाच्या कामाची गेली चौदा वर्षांपासून चांगलीच रखडपट्टी सुरु असून, प्रवासी पर्यटकांना वनवास भोगावा लागत आहे.

माणगाव व इंदापूर शहराला बायपास दिला गेल्याने तळ कोकणासह गोवा व दक्षिणेकडील पर्यटकांना अंतर कमी झाल्याने कोकण व गोवादर्शन सहज घडवता येईल, अशी आशा पर्यटकांना वाटत होती. मात्र, या बायपासचे काम यापूर्वी वनखाते व रेल्वे खात्याच्या मंजुरीत अडकल्याने बायपास कामाचे तीनतेरा वाजले होते.

वनखात्याची मंजुरी मिळाली मात्र, निधी अपुरा पडत असल्याने व शासनाकडून वेळेवर निधी मिळत नसल्याचे कारण पुढे करीत पूर्वीच्या ठेकेदाराने हे काम सोडून दिले. त्यानंतर ठेकेदार बदलून सनी इंटरप्रायजेस कंपनीकडे हे काम दिले. त्यानंतरही बायपासच्या कामात व रुंदीकरणाच्या कामात म्हणावी तितकी गती मिळत नसल्याने माणगाव व इंदापूर बायपासच्या कामाचा तिढा आजही कायमच राहिला आहे.

हा बायपास रस्ता वनखात्याच्या जमिनीतून जातो. कोकण रेल्वेला उड्डाण पूल होत असल्याने इंदापूर आणि माणगाव येथील दोन्ही शहरालगतचे बायपासचे काम रखडले आहे. त्यातच वैयक्तिक मालकी जमिनीच्या काही मालकांना भूसंपादनाचा मोबदला मिळाला नसल्यामुळे बायपासचे काम रखडले आहे. केंद्रीय रस्ते, वाहतूक महामार्ग मंत्री यांनी ३ एप्रिल २०२२ रोजी इंदापूर येथील कार्यक्रमात मुंबई-गोवा महामार्गाच्या रस्त्याचे काम एक वर्षात पूर्ण करू, अशी ग्वाही दिली होती. माणगाव कळमजे पुलाजवळून नाणोरे गावालगत या बायपास रस्त्याचे काम २०१७ मध्ये सुरु झाले. हे काम ३० टक्के करण्यात आले होते. हा बायपास रस्ता सात किमीचा असून, तो माणगाव शहराबाहेरून काढण्यात आला आहे. माणगावात वाहतुकीचा ताण पडत असून, वारंवार पर्यटक नागरिकांना वाहतूक कोंडीशी सामना करावा लागत आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे कामाचे गेली अनेक दिवस घोंगडे भिजत पडले आहे.

त्यामुळे प्रवासी, पर्यटक, नागरिकांत कमालीची नाराजी पसरली आहे. अखेर शासनावर दबाव वाढत असल्याने या रुंदीकरणाच्या कामाची गाडी धिम्या गतीने का होईना सुरु असून, त्या कामाला आणखीन म्हणावा तितकी गती मिळत नाही. मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरण कामाला गती कधी मिळणार, असा संतप्त सवाल नागरिकांतून होत आहे.

## लघु पाटबंधारे चौकी बनली मद्यपींचा अड्डा



**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

गेल्या अनेक वर्षापासून सुतारवाडी लघु पाटबंधारे चौकीची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. येथील निसर्गरम्य परिसरात मद्यपी हजेरी लावत असून येथील वृक्षाखाली दारूच्या आणि पाण्याच्या बाटल्या दिसून येत आहेत. वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास येथील बाब आणूनसुद्धा याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

इमारतीच्या सभोवताली कुंपण नसल्यामुळे कोणीही या परिसरात येत असतात. येथे अनेक फार्म हाऊस आणि रिसॉर्ट सुद्धा आहेत. त्यामुळे पाणीपट्टी मोठ्या प्रमाणावर वसुली होत असते. चौकीसाठी चौकीदार आणि सुसज्ज इमारत नसल्यामुळे येथील परिसर भग्न अवस्थेत दिसत आहे. मूळ जमीन मालक यांचे म्हणणे आहे की,येथील चौकीची नव्याने दुरुस्ती करावी नाहीतर मूळ मालक यांना ही जमीन परत करावी. चौकीच्या दरवाजासमोर कोंबड्यांची पिसे व अन्य कचरा टाकल्यामुळे मोठी दुर्गंधी येत असते. येथील रहिवासी सचिन साळवी त्यांनी सांगितले की, येथील धरणातून पाण्याचा अनधिकृत उपसा होत असतो. याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. येथील चौकी लवकरात लवकर दुरुस्त करावी अशी मागणी होत आहे.

## अंगणवाडी सेविकांनी पथनाट्याद्वारे केली मतदान जनजागृती



**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तहसील कार्यालय तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने स्वीप पथकाअंतर्गत तळा बाजार पेठेतील बळीचा नाका ते बस स्थानक या दरम्यान तळा तालुक्यातील अंगणवाडी सेविकांची रॅली आयोजित करण्यात आली होती.

यावेळी तहसीलदार स्वाती पाटील, तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे, भारत जाधव तसेच तहसील कार्यालयातील कर्मचारी, उपस्थित होते. यावेळी सेविकांनी पथनाट्यातून मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय, तळा यशथील स्वीप पथकाच्या नोडल अधिकारी दिपाली शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली अंगणवाडी सेविकांमार्फत तळा बाजारपेठ परिसरात मतदान जनजागृती मोहीम राबवण्यात आली.

लोकसभा निवडणुकीकरिता लोकांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याकरिता मार्गदर्शन करण्यात आले. संपूर्ण देशभरात निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. भारतातील लोकशाही बळकट करण्यासाठी मतदारांना अधिक महत्त्व आहे. हे अंगणवाडी सेविकांनी सर्व मतदारांना समजावून सांगितले.

## जिल्हाधिकारी पोहचले सिद्धेश्वर आदिवासी वाडीवर

### मतदानाच्या दिवशी सर्वांना भरपगारी सुट्टी



**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

आदिवासी गावांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. जिल्ह्यात आदिवासी समाजाच्या बोली भाषेतील पथ नाट्याद्वारे मतदार जनजागृती करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते सिद्धेश्वर बु.येथे या मतदार जनजागृती अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या जनजागृती कार्यक्रमावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी जावळे बोलत होते.

एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प पेण प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांच्या सहकार्याने आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे आणि जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात हा पथदर्शी उपक्रम राबविला जात आहे. आदिवासी समाजाची युवक आणि प्राथमिक शिक्षक हे पथनाट्य सादर करीत आहेत.

याप्रसंगी उपजिल्हा निवडणूक सिद्धेश्वर बु. येथे आयोजित या कार्यक्रमासाठी उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार उत्तम कुंभार आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, आदिवासीवाड्या वस्त्या, गावे येथील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. या प्रत्येक गावासाठी एक स्वतंत्र मतदार दूत नेमण्यात येणार आहे. या दुतामार्फत गावातील प्रत्येक मतदाराला मतदानासाठी प्रवृत्त करण्यात येणार आहे. मतदानाच्या दिवशी सर्वांना भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे. त्यामुळे मतदारांनी कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता निर्भीड पणे मतदान करावे असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी यावेळी केले.

आदिवासी बहुल गावामधील मतदार काम व नोकरीसाठी कुठल्या आस्थापनांमध्ये जात असतील तरी तेथे सुट्टी देण्याबाबत निर्देश देण्यात येत आहेत. सर्व आदिवासी मतदारांना भर पगारी सुट्टी किंवा सवलत देण्याबाबत कळविण्यात येईल असे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले.

या पथनाट्याचे लेखन, दिग्दर्शन राजू लहू बांगारे यांनी केले आहे. तसेच गीतकार दामोदर शिद, वादक सतिश खाणेकर आहेत. या पथनाट्यात राजू बांगारे, दामोदर शिद, ज्ञानेश्वर शिद, गणपत पारधी, साई बांगारे, श्रेयश वारगुडे, वेदांत शिंदे यांनी सहभाग घेतला.

## मुरूडमध्ये संगीत समारोह

**। मुरूड । वार्ताहर ।**

पै.खाँसाहेब आबीद हुसैन स्मृती संगीत मंडळ जंजिरा मुरुड तर्फे खाँ साहेब व कै. वामनराव भावे यांच्या स्मरणार्थ रविवारी (दि.१४) मुरूडच्या वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या सभागृहात एका संगीत समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी इंदौर येथील यश फापुनकर व सार्थक संगमनेरकर यांचे सहगायन नांदगावच्या प्रिया कुलकर्णीचे गायन तसेच संगीत मंडळाचे कलाकार गायन व वादन सादर करणार आहेत.सदर कार्यक्रमात प्रिया कुलकर्णी हिला या वर्षीचा गिरिजा कीर संगीतप्रेमी पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

## अग्निशस्त्र बाळगणारे गजाआड

■ हत्यारे जप्त; दोघांवर गुन्हा

■ नवी मुंबई पोलिसांचे यश

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलिसांनी बेकायदेशीर अग्निशस्त्र खरेदी-विक्रीविरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत सीबीडी पोलिसांनी बुधवारी (ता. १०) सेक्टर-१५ मधून गावठी कट्टा, पिस्तुल व जिवंत काडतुसासह दोघांना अटक केली आहे. त्यांनी ही शस्त्रे कुठून तसेच कशासाठी आणली होती, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील बेकायदेशीर अग्निशस्त्र, दारूगोळा बाळगणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम सुरू आहे. याच अनुषंगाने बुधवारी सकाळी सीबीडी सेक्टर-१५ मधील चावला इमारतीसमोरील भागात सीबीडी पोलिसांनी सापळा लावला होता. यावेळी निरंजन देशमुख व सुरेशकुमार चौधरी या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

यावेळी निरंजन याच्याजवळ एक गावठी कट्टा, पाच जिवंत काडतुसे होती. तर सुरेशकुमारजवळ एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्तुल, दोन जिवंत काडतुसे आढळून आली आहेत. पोलिसांनी हत्यारे जप्त करून दोघांवर भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल आहे.

## श्रीवर्धनमध्ये रस्त्यांची निकृष्ट कामे

### अंतर्गत मार्गावरील खडी उखडली; कोट्यवधी रुपये पाण्यात

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

निसर्ग पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन- दांडगुरी मार्गावरील वावेपंचतन येथील डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप वाहनचालकांसह नागरिकांकडून करण्यात येत आहे.

रस्ते गुळगुळीत दिसत असलेतरी अनेक ठिकाणी खडी उकरली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे झाल्याचे सांगण्यात येत आहे. बांधकाम विभागाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, तीन किमीच्या रस्त्यासाठी चक्क तीन कोटी रुपये खर्च केले असूनही रस्ता निकृष्ट झाला असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

**डांबराचा कमी वापर**

**रस्त्याच्या दुरुस्तीदरम्यान डांबराचा वापर कमी करण्यात आला आहे. साईटपट्टी योग्यप्रकारे केली जात नसल्याचे सांगण्यात येत आहे. कामाचा दर्जा, साईडपट्टी, डांबर, खडी आदी सर्व बाबी लक्षात घेऊन दर्जात्मक काम करणे गरजेचे होते. ठेकेदारांकडून कामात थुकपट्टी लावण्यात आली आहे. सुरुवातीला डांबरमिश्रीत खडीचा थर टाकला आहे. मात्र, वळणावर त्यातील खडी पूर्णपणे विखुरली गेल्याचे दिसून येत आहे.**

> **विभागाकडून रस्त्याची पाहणी करू. काम निकृष्ट असेल तर ठेकेदाराच्या अनामत रकमेमधून पुन्हा काम करून घेऊ.**
> **– तुषार लुंगे, उपअभियंता, श्रीवर्धन सार्वजनिक बांधकाम विभाग.**

सुट्टीच्या दिवशी येणाऱ्या पर्यटकांना खराब रस्त्यांचा सामना करावा लागत आहे. नुकतेच श्रीवर्धन- दांडगुरी मार्गावरील वावेपंचतन येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे. या रस्त्यासाठी तीन कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. मात्र, तरीदेखील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे वाहनचालक सांगत आहेत.

## आदिवासींसाठी मोबाईल मेडिकल युनिट

■ पथकात तज्ज्ञ कर्मचारी तैनात

■ पं.समितीसमोर झाले उद्घाटन


**। खोपोली । वार्ताहर ।**

आदिवासी वाड्यावस्त्यांवर मेडिकल सेवा वेळेवर मिळत नसल्यामुळे अनेक आजारांना बळी पडतात. या गंभीर समस्येची दखल घेत पीएम जनमन योजनेअंतर्गत मोबाईल मेडिकल यूनिट (एमएमयू) सेवा सुरू करण्यात आली आहे.

बुधवारी (दि.१०) खालापूर पंचायत समितीच्या कार्यालयासमोर गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. तालुक्यासाठी एक मोबाईल वाहन रुग्णालय दिले असून त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, पॅथॉलॉजिस्ट, औषधनिर्माता असे पथक असणार आहे. त्याचा सर्वाधिक लाभ आदिवासी भागाला होणार आहे. मोबाईल मेडिकल युनिट उद्घाटनाप्रसंगी आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद रोकडे, तालुका आरोग्य पर्यवेक्षक अबुर्ले, स्वप्निल पाटील, कुणाल पालसकर, स्वाती गावडे यांच्यासह मोबाइल मेडिकल युनिटमधील वैद्यकीय अधिकारी डॉ.आदिती म्हात्रे,निकिता चोरमले, प्रयोगशाळा तंत्रज्ञ विद्या पाटील,आरोग्य सेविका शर्मिला गावंड उपस्थित होते.

## पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई युद्धपातळीवर

### आयुक्तांचा अचानक काम पाहणी दौरा



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महापालिका क्षेत्राची जबाबदारी प्रशासकांच्या खांद्यावर असल्याने महापालिकेचे प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी कामाची सूत्रे हाती घेऊन पावसाळ्यापूर्वी नालेसफाईच्या कामाची सूचना विभाग अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिल्यावर बुधवारी प्रत्यक्ष नालेसफाई सुरू असताना अचानक आयुक्त डॉ. रसाळ यांनी भेट देऊन काम करणाऱ्या कंत्राटदाराला धक्का दिला.

सध्या कळंबोली आणि कामोठे या परिसरातील नालेसफाई सुरू असून उर्वरीत खारघर व पनवेल शहरातील नालेसफाईची कामे शासनाच्या परवानगीनंतर पालिका सुरु करणार असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली व कामोठे परिसरातील नालेसफाईची कामे करण्यासाठी पालिका सुमारे चार कोटी रुपये खर्च करणार आहे. कंत्राटदाराला पुढील दोन वर्षांसाठी हा ठेका देण्यात आला आहे. प्रभाग क्रमांक ९ येथील कळंबोली विभागामधील खिडुकपाडा गाव परिसरातील नाले साफसफाई सुरू असलेल्या कामाची पाहणी पालिका आयुक्त डॉ. रसाळ यांनी केली.

यावेळी पालिका उपायुक्त डॉ. वैभव विधाते, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, किरण जाधव, अरुण कांबळे आणि स्वच्छता निरीक्षक अमित जाधव हे अधिकारी उपस्थित होते. सध्या कामोठे व कळंबोलीमध्ये नालेसफाईसाठी कळंबोलीमध्ये २ पोखलन, २ जेसीबी, २ टिपर, २ टिपर, १७० मनुष्यबळ कार्यरत असून कामोठे वसाहतीमध्ये ९३ मनुष्यबळाच्या सहाय्याने नालेसफाई होत असल्याची माहिती डॉ. वैभव विधाते यांनी दिली.आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून नाले व गटारांमधील साचलेला गाळ सफाईचे काम सुरु असल्याचा दावा पालिकेने केला आहे.

## मातीच्या मडक्यांना अच्छे दिन



**। वडखळ । वार्ताहर ।**

मागील दोन आठवड्यांपासून वातावरणात वाढत असलेल्या गरमीमुळे अनेकांनी बचावात्मक पवित्रा घेत अनेक वेगवेगळे उपाय करण्यास सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणजे फ्रीजऐवजी अनेकजण मातीच्या मडक्यातील थंड पाण्याला पसंती देत आहेत. त्यामुळे कुंभाराच्या मातीच्या मडक्याला दिवसेंदिवस मागणी वाढत आहे.

जुन्या काळातील माठाचा वापर मधल्या काळात कुठेतरी लोप पावत चालला होता. त्यातच कुंभारांना मडकी बनविण्यासाठी लागणारी माती, लाकडे, तूस, राखाडी या गोष्टी आजच्या डिजिटल युगात मिळणे कठीण झाले होते. त्यामुळे कुंभारांच्या व्यवसायावर गदा आली होती. मात्र, दोन वर्षांपूर्वी कोरोना काळात अनेकांनी आपल्या जीवनशैलीत बदल केले. पिण्याच्या थंड पाण्यासाठी फ्रीजचा वापर कमी करून मातीच्या माठांना अधिक पसंती मिळू लागली. त्याचा परिणाम गेल्या दोन वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर मातीच्या मडक्यांची जोरदार विक्री सुरू झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेने यंदा मातीच्या मडक्यांच्या विक्रीमध्ये जवळपास दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. सध्या बाजारात मोठा माठ पाचशे रुपये, मध्यम आकाराचा तीनशे रुपये आणि लहान आकाराचा माठ दोनशे रुपयांना विकला जात आहे. मात्र, किमतीत वाढ झाली असली तरी मातीच्या मडक्याला पसंती मिळत आहे.

> **पूर्वी असणारी अमाप जागा, मडकी बनविण्यासाठी वापरली जाणारी इतर लाकडे, माती, राखाडी, तूस आदी गोष्टी मिळेनाशा झाल्या असल्या तरी आम्ही आमचा पूर्वापार व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. मडकी बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल महाग मिळत आहेत. त्यामुळे इच्छा नसूनदेखील आम्हाला ग्राहकाला थोड्या चढ्या भावाने मडकी विकावी लागत आहेत, मात्र तरीदेखील यंदा ग्राहकांचा मडकी विकत घेण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळत आहे.**
> **– जितेंद्र साखळूणकर, कुंभार**

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# बाबा रामदेव, बाबा मोदी

बाबा रामदेव यांना सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आहे. बाबांनी औषधाच्या खोट्या जाहिराती दिल्या. न्यायालयाने त्यांचे पितळ उघडे पाडले. बाबा म्हणाले, आम्ही माफी मागतो. न्यायालय म्हणाले हा निव्वळ बनाव आहे. बाबांना आता दंड होणार की ते तुरुंगात जाणार हे लवकरच ठरेल. बाबांचा इथवरचा प्रवास कसा झाला? तर तो असा की, तेभगवे कपडे घालतात. शास्त्रपुराणांमधल्या गोष्टी सांगतात. अशक्य वाटतील अशी योगासने करून दाखवतात. पोटाची आतडी गोल-गोल फिरवून दाखवतात. ती बघूनच माणसांना धाप लागते. माणसे त्यांची भक्त होतात. हा बाबा कोणी अवलिया साधू आहे असे त्यांना वाटू लागते. ते त्याच्या प्रत्येक शब्दावर विश्वास ठेवतात. मग बाबा फुशारून जातात. आयुर्वेद कसा श्रेष्ठ आहे हे सांगतात. लोकांना आयुर्वेदाविषयी प्रेम असतेच. त्याची बरीच कारणे असतात. एकतर त्यात तपासण्या नसतात. वैद्यावर भरवसा टाकला की भागते. औषधांचे दुष्परिणाम नसतात असा समज असतो. सर्वात महत्वाचे म्हणजे एलोपथिक औषधे महाग असतात. रामदेव याच्यासारख्या बाबांना हे फायद्याचे ठरते. मग ते औषधांच्या धंद्यात उतरतात.पतंजलीच्या नावाने कंपनी काढतात. पतंजली हा एक ऋषी होता. त्याने अष्टांग योगाचे महत्व सांगितले. तो कित्येक शतकांपूर्वी वारला. त्यामुळे त्याला रॉयल्टी देण्याचा काही प्रश्न नाही. माझे नाव वापरू नका असे सांगायला तो येत नाही. इतर कंपन्यांना औषधांच्या रॉयल्टीसाठी बरेच पैसे मोजावे लागतात. इथे ते नाही. शिवाय, रामदेव यांचा चेहरा हा हुकुमी एक्का असतो. योगासनांमुळेहा चेहरा घराघरात गेलेला असतो. आता, ते स्वतःचविकतायत म्हणजे औषधे जबरदस्त असणारच, असे लोकांना वाटते. पाहता पाहता त्यांच्या कंपनीची उलाढाल हजारो कोटींच्या घरात जाते. नंतर, इतके लाखो लोक औषधे घेत आहेत म्हणजे ती प्रभावी असणारच असे उरलेल्या लाखो लोकांना वाटते. मग तेही बाबांचे ग्राहक होतात.

## पतंजलीचा खोटा प्रचार

याच दरम्यान, देशात भाजपचे नरेंद्र मोदींचे सरकार येते. बाबा म्हणजे योगगुरु. हिंदू धर्मात योगाला महत्वाचे स्थान. मोदींचा पक्ष हिंदुत्ववादी. साहजिकच बाबांचे आणि त्यांचे लगेच जुळते. बाबांचा भक्तवर्ग हा मोदींचाहीभक्तवर्ग बनतो. उलटही घडते. मोदींचाभक्तवर्ग बाबांची औषधे घेऊ लागतो. दोघांचाही दोघांना फायदा. एक काळ असा असतो की बाबा हिंदुस्थानलिव्हरसारख्या कंपन्यांच्या उत्पादनांवर टीका करतात. ही उत्पादने तुमच्या आरोग्याला अपायकारक असतात असे ते सांगतात. म्हणजे, यांच्या बिस्टिटांमध्ये किंवा नूडल्समध्ये मैदा असतो. किंवा, यांच्या साबणामध्ये घातक रसायने असतात इत्यादी. पण मग बाबा हळूच आपले धोरण बदलतात. त्यांची पतंजली कंपनीदेखील साबण, बिस्किटे, टूथपेस्ट तयार करू लागते. बाबांचा बचाव असा असतो की, ही शुद्ध देशी उत्पादने आहेत. पण गंमत अशी असते की, त्यात तेच घटक असतात जे इतर कंपन्यांच्या साबण किंवा टूथपेस्टमध्ये असतात. पण लोक बाबांच्या खोटेपणाकडे दुर्लक्ष करतात. बाबांचा धंदा जोरात वाढतो. त्यांचे धाडसही वाढते. त्याच दरम्यान कोरोना येतो. कोरोना हा विषाणूमुळे होतो. या विषाणूवर औषध नाही. केवळ आजाराच्या लक्षणांवर इलाज करता येतात. प्रतिकारशक्ती वाढवावी लागते. जगभरातले जाणकारांनी हे सांगितलेले असते. पण बाबा मैदानात उतरतात. पतंजलीच्या औषधांनी रोगी कसे बरे होतात याचे खोटे दावे सुरू करतात. कोरोनील नावाच्या गोळ्यांची सरकारी खर्चाने प्रसिध्दी सुरू होते. त्यांच्या कार्यक्रमाला नितीन गडकरी आणि असेच बरेच मंत्री येतात. हिंदी टीव्ही वाहिन्यांवरून बाबांचे गुणगान होते. याला इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉक्टर्स आक्षेप घेतात. सरकारचा नाईलाज होतो. या जाहिराती बंद करा असे बाबांना सांगितले जाते. पण बाबा ऐकत नाहीत. मधल्या काळात रामदेव आणि बालकृष्णइत्यादींना आजार होतात. त्यावर ते एलोपथीचेच उपचार घेतात. तरीही खोटेपणा थांबत नाही. २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालय त्यांना तंबी देते. जाहिराती बंद न झाल्यास दंडाचा इशारा देते.

## जनतेच्या न्यायालयात

तरीही बाबांच्या जाहिराती चालूच राहतात. एलोपथीची औषधे घेऊनदेखील डॉक्टर स्वतःच मरत आहेत, तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू नका, कोरोनाची लस घेऊ नका असा प्रचार चालू राहतो. २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालय अंतिम इशारा देते. पतंजलीवाले पुन्हा असे होणार नाही असे म्हणतात. पण बाहेर गेल्यावर पुन्हा त्यांचे येरे माझ्या मागल्या असे सुरू होते. अखेर २०२४ मध्ये पुन्हा सर्वोच्च न्यायालयात प्रकरण येते. एकदा माफी मागूनही पतंजलीच्या जाहिराती आणि टीव्हीवरचीप्रसिध्दी चालूच आहे हे न्यायालयाला स्पष्ट दिसते. मग न्यायालय कडक पवित्रा घेते. बाबांना वाटते पूर्वी एकदा हेच झाले आहे. न्यायालय आपले काय वाकडे करणार आहे? ते एक माफीपत्र सादर करतात. पण न्यायालय आता सावध असते. ते शाब्दिकरीत्याबाबांचे तोंड रंगवतात. येत्या आठवड्यात त्यांचा अंतिम फैसला होणार आहे. नीट पाहिले तर लक्षात येईल की, बाबा रामदेव आणि बाबा नरेंद्र मोदीयांच्यात भरपूर साम्य आहे. हे बाबा आधी हिंदुत्वाची शाल पांघरून आले. रामाचे नाव घेतले. लोकांना वाटले की हे देखील रामराज्यच आणणार. मग बाबांनी जसे साबण आणि टूथपेस्ट आणले तसेच यांनी काँग्रेसचेच कार्यक्रम नव्या नावांनी आणले. जोरदार जाहिरात केली. दुसरीकडे नेहरू, काँग्रेस यांना सदैव शिव्या दिल्या. जशारामदेवांनीएलोपथीला दिल्या. अनेकदा त्यांचे म्हणणे खोटे आहे हे लोकांनी दाखवून दिले. तरीही त्यांचा खोटेपणा चालूच राहिला. सध्याचा प्रचार निव्वळ त्यावरच उभा आहे. उदाहरणार्थ, निवडणूक रोख्यांमध्ये भाजपनेहजारो कोटींचा भ्रष्टाचार केला. तरीही विरोधकांनाच भ्रष्टाचारी म्हणणे चालू आहे. थोडक्यात, या बाबा मोदींना धडा शिकवण्याची वेळ आली आहे. हे प्रकरण आता जनतेच्या न्यायालयापुढे सादर होते आहे. तीदेखील सर्वोच्च न्यायालयाप्रमाणेच कडक फैसला देईल अशी अपेक्षा आहे.

विचार

# पृथ्वीचे फिरणे थांबले तर...?

**पृथ्वीचे वाढते तापमान किती धोकादायक ठरू शकते, हे या ना त्या स्वरुपात आपल्यापर्यंत पोहोचले आहे. सध्याची स्थिती ही भीती वा दहशत वाढवणारी आहे. मात्र वाढत्या तापमानामुळे आगामी काळात मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात. वातावरणातील बदलामुळे पृथ्वीच्या फिरण्याच्या गतीवर परिणाम होत आहे. त्यामुळेच भविष्यात जागतिक घडाळ्यांची वेळ ठरवताना काही बदलही होताना दिसू शकतात.**



मिलिंद बेंडाळे

पृथ्वीचे वाढते तापमान हा जागतिक पातळीवरील चिंतेचा विषय असून प्रत्येक देश कोणत्या ना कोणत्या प्रकारे याचे परिणाम भोगत आहे. वाढत्या तापमानाच्या परिणामस्वरुप ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकामध्ये बर्फ वेगाने वितळत आहे. परिणामी, समुद्राची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. बर्फ वितळल्यामुळे आणि पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यामुळे पृथ्वीच्या फिरण्याचा वेग थोडा कमी होत आहे. 'नेचर' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात म्हटले आहे की जागतिक तापमानवाढीमुळे आधीच जागतिक टाइमकिपिंगवर परिणाम होत आहे. 'कोऑर्डिनेटेड युनिव्हर्सल टाइम' (यूटीसी) चा वापर जगभरातील घड्याळांची वेळ ठरवण्यासाठी केला जातो. 'यूटीसी' पृथ्वीच्या फिरण्याच्या गतीवर ठरवली जाते. अर्थातच पृथ्वीच्या परिभ्रमणाचा वेग स्थिर नाही. त्यामुळे त्याचा थेट परिणाम आपल्या दिवस आणि रात्रीच्या लांबीवर होऊ शकतो. पृथ्वीच्या परिभ्रमणाचा वेग मंदावला तर दिवस मोठा होऊ शकतो.

'ग्लोबल टाइमकीपर्स'नी १९७० पासून जागतिक घड्याळात २७ लीप सेकंद जोडले आहेत. तथापि, आता प्रथमच टाइमकीपर्स २०२६ मध्ये जागतिक घड्याळ एका सेकंदाने कमी करण्याचा विचार करत आहेत. या घटनेला 'निगेटिव्ह लीप सेकंड' म्हणतात. तज्ज्ञांच्या मते, आजपर्यंत 'निगेटिव्ह लीप सेकंड'चा वापर कधीही झालेला नाही. धोक्याची बाब म्हणजे त्याचा वापर जगभरातील संगणक प्रणालींसाठी अभूतपूर्व समस्या निर्माण करेल. यासंबंधी बोलताना कॅलिफोर्निया विद्यापीठातील संशोधक डंकन ॲग्न्यू म्हणतात, 'याआधी कधीच असे घडले नव्हते. जागतिक 'टायमिंग इन्फ्रास्ट्रक्चर'चे सर्व भाग जगभरात समान वेळ दाखवतात की नाही याची खात्री करणे हे एक मोठे आव्हान आहे. वर उल्लेख केलेली घटना घडल्यास त्यांचे कोडिंग नव्याने करावे लागेल.'

आधी उल्लेख केल्याप्रमाणे जगातील वाढत्या तापमानाचा थेट परिणाम ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकावर तीव्रतेने होत आहे. याबाबतचा नुकताच प्रसिद्ध झालेला अभ्यास धक्कादायक आहे. पृथ्वीच्या फिरण्याच्या गतीवर याचा परिणाम होणे ही अत्यंत चिंतेची बाब समजली जात आहे. संशोधक डंकन ॲग्न्यू म्हणतात त्याप्रमाणे पृथ्वी नेहमी एकाच वेगाने फिरत नसल्यामुळे 'युनिव्हर्सल टाईम'वर परिणाम दिसून येतो. तसे पाहिले तर १९७२ पासून जगभर वेळोवेळी लीप सेकंद जोडण्याची गरज भासू लागली आहे.
याचे कारण संगणकीय आणि वित्तीय बाजारपेठेतील नेटवर्कशी संबंधित व्यवहारांमध्ये अचूक वेळेची आवश्यकता असते. पृथ्वीच्या परिभ्रमणातील नुकसानाची भरपाई करण्यासाठी आणि 'यूटीसी'ला सौर वेळेसह संक्रमित ठेवण्यासाठी एक मध्यांतर सेकंद जोडला जातो. अमेरिकेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठातील संशोधक डंकन ॲग्न्यू यांचे हे संशोधन सध्या जागतिक पातळीवर चर्चेचा विषय बनले आहे.

अर्थात पृथ्वीच्या फिरण्याचा वेग वाढला तरी २०२९ पर्यंत लीप सेकंद कमी करण्याची गरज भासणार नाही, असेही काही तज्ज्ञ सांगतात. मात्र बर्फाचे वितळणे असेच सुरू राहिल्यास परिस्थिती बिकट होईल, यात शंका नाही. 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे केवळ अंटार्क्टिकाचा बर्फ वितळत नाही, तर हा धोका अन्य अनेक ठिकाणी जाणवत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की बर्फ इतक्या वेगाने वितळत असल्यामुळे समुद्रातील पाण्याचा प्रवाह कमी होताना दिसत आहे. स्थिती अशीच राहिल्यास जगभरातील जलस्रोतांमध्ये ऑक्सिजनची कमतरता भासेल. 'नेचर' जर्नलमध्ये प्रकाशित एका संशोधनात म्हटले आहे की, बर्फ जास्त वितळला तर अंटार्क्टिकाचे पाणी कमी खारट आणि अधिक तरल होईल. यामुळे खोल समुद्रातील प्रवाह कमी होईल. समुद्रातील प्रवाह कमी झाल्यास चार हजार मीटरपेक्षा खोल भागात पाण्याचा प्रवाह थांबेल आणि दलदलीसारखी परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे सागरी जीवनावर अत्यंत विपरीत परिणाम होणार आहे. पाण्यातील ऑक्सिजन कमी झाल्यामुळे पोषक तत्वांची कमतरता भासते. परिणामी, पाण्यातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढेल. हे सगळे लक्षात घेता सध्या जगभर एक प्रकारची सतर्कतेची स्थिती आहे, असे म्हणावे लागेल.

जागतिक तापमानवाढीच्या वाढत्या नकारात्मक परिणामांबद्दल जगभरातील शास्त्रज्ञांनी आधीच चिंता व्यक्त केली आहे. याबाबत अभ्यास करणारे संशोधक ॲग्न्यू हे कॅलिफोर्निया विद्यापीठातील 'स्क्रिप्स इन्स्टिट्यूशन ऑफ ओशनोग्राफी' येथे भूभौतिकशास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. ग्लोबल वॉर्मिंग आणि ग्लोबल टाइम यांचा अतूट संबंध आणि त्याचे भविष्यातील परिणाम हा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे. पृथ्वी दर २३ तास ५६ मिनिटे आणि चार सेकंदांनी सूर्याभोवतीची एक प्रदक्षिणा पूर्ण करते. तिचा फिरण्याचा वेग ताशी १,६७४ किलोमीटर इतका आहे. हा वेग एखाद्या लढाऊ विमानाएवढा आहे; पण पृथ्वीचा आकार एवढा मोठा आहे की आपण हे परिभ्रमण अनुभवू वा शोधू शकत नाही. अर्थात अंतराळ स्थानके किंवा उपग्रहांद्वारे पृथ्वीचे परिभ्रमण पाहिले जाऊ शकते. असे असताना कोणत्याही विपरीत परिस्थितीच्या परिणामस्वरुप पृथ्वीचे फिरणे थांबले तर दृश्य किती भयानक असेल याचा विचार करणेही अशक्य आहे. हे सर्व अचानक घडले तर जगाला मोठा धक्का बसेल. पृथ्वीचे फिरणे कायमचे थांबले तर पृथ्वीच्या एका भागात दिवस आणि दुसऱ्या भागात रात्र असेल. यामुळे एका भागाचे तापमान वाढेल आणि दुसऱ्या भागात थंडी वाढेल. याचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र संपेल. यामुळे अंतराळातून येणारे रेडिएशन थेट पृथ्वीवर पोहोचेल. सहाजिकच जगभरात अनेक आजार पसरू लागतील.

तंत्रज्ञानामुळे वेगाने विकसित होत असणाऱ्या आजच्या जगात कार्बन उत्सर्जन मानवी अस्तित्वासाठी सततचा धोका बनत आहे. त्याचे वैशिष्ट्य संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालातही समोर आले आहे. त्यात २०१४ ते २०२३ दरम्यानचा काळ सर्वात उष्ण दशक असल्याचा दावा करण्यात आला आहे. मध्यंतरीच संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक हवामान संघटनेने (डबल्यूएमओ) आपला वार्षिक हवामान स्थिती अहवाल प्रसिद्ध केला. आकडेवारीचा हवाला देत त्यात म्हटले आहे की २०२३ हे आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष होते. २०१४ ते २०२३ हा काळ सर्वात उष्ण दशक म्हणून नोंदवला गेला आहे. या दहा वर्षांमध्ये महासागरांवर उष्णतेच्या लाटांचा परिणाम झाला. जागतिक हवामान संघटनेच्या अहवालावर संयुक्त राष्ट्र प्रमुख अँटोनियो गुटेरेस यांनी चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, या अहवालावरून आपली पृथ्वी नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येते. आपला ग्रह संकटाची चिन्हे दाखवत आहे. जीवाश्म इंधन प्रदूषण चार्ट हवामानातील बदलाने सजीवांचे किती नुकसान होत आहे, हे दर्शवतो. पृथ्वीवर किती वेगाने बदल होत आहेत याचा हा इशारा आहे. एक प्रकारे हा अहवाल जगासाठी 'रेड अलर्ट' आहे. उष्णतेचे रेकॉर्ड पुन्हा एकदा मोडले गेले तर परिस्थिती हाताबाहेर जाण्यास फारसा वेळ लागणार नाही.

वाढत्या तापमानाने विशेषतः महासागरांमध्ये उष्णतेच्या लाटा वाढल्या आहेत. हिमनद्या वितळल्या आणि मागे सरकल्या आहेत. अंटार्क्टिक महासागराच्या बर्फाचे पाणी चिंतेचा विषय ठरत आहे. १९५० मध्ये नोंदी सुरू झाल्यापासून जगभरातील प्रमुख हिमनद्यांमधील बर्फाचे सर्वाधिक नुकसान झाले आहे, हे दिसते. विशेषतः पश्चिम उत्तर अमेरिका आणि युरोपमध्ये परिस्थिती अधिक बिघडली आहे. एल निनोचा प्रभाव २०२३-२४ मध्ये सर्वोच्च स्तरावर पोहोचला आहे. येत्या काही महिन्यांमध्ये जागतिक हवामानावर याचा परिणाम होताना दिसेल. मार्च ते मे दरम्यान जवळजवळ सर्व भूभागांमध्ये तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता व्यक्त केली होती. सध्याची स्थिती या अपेक्षेच्या जवळ जाणारी आहे. सध्या 'एल निनो'च्या प्रभावामुळे जगभरात विक्रमी तापमान अनुभवायला मिळत असून अनेक गंभीर घटना बघायला मिळत आहेत.

यंदा जानेवारीमध्ये जागतिक सरासरी तापमानाने प्रथमच १.५ अंश सेल्सिअसचा उंबरठा ओलांडला आहे. मे पर्यंत अल निनोचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता सुमारे ६० टक्के आहे. त्यामुळे २०२४ हे सर्वात उष्ण वर्ष ठरू शकते. त्यात म्हटले आहे की वर्षाच्या अखेरीस ला निना विकसित होण्याची शक्यता आहे. असे झाले तर चांगला पाऊस होईल. भारतातील 'ला-नीना'चे बारकाईने निरीक्षण करणाऱ्या शास्त्रज्ञांनी म्हटले आहे की जून-ऑगस्टपर्यंत 'ला निना'ची स्थिती निर्माण झाल्यास २०२३ च्या तुलनेत या वर्षी मॉन्सून चांगला असेल. भारतासाठी ही निश्चितच दिलासादायक म्हणावी लागेल.

आजकाल

# लिंबाचे वाढलेले भाव आणि शेतकऱ्यांची फसवणूक

सोमिनाथ घोळवे

काल भाजी स्टॉलवरून १० रुपयांला एक प्रमाणे २० रुपयांची दोन लिंबू खरेदी केली. (पहा फोटो) मला आठवते, गेल्या वर्षी याच दिवसांमध्ये एक लिंबू ५ रुपयाला एक होते. लिंबाच्या दरात चालू वर्षी जवळपास दुप्पट वाढ झालीय. ही वाढ ग्राहकांना शेतमाल-भाजीपाला खरेदी करण्यासाठी झाली आहे. पण उत्पादक घटक अर्थात शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पैशांमध्ये झालीय का?. तर नाही. गेल्या वर्षी या दिवसांमध्ये शेतकरी ५० ते ६० रुपये किलोने विकत होते. शेतकऱ्यांना आताही तोच भाव आहे. ६० रुपये किलो. एका किलोमध्ये जळवपास २५ ते ३० लिंबू बसतात. अर्थात शेतकरी २ रुपयांना एक लिंबू व्यापारी किंवा मध्यस्थीला देत आहे. व्यापारी मात्र ग्राहकांना १० रुपयांना देत आहे. एक-दोन दिवसांमध्ये ८० टक्के परतावा मिळवत आहेत. शहरी ग्राहकांना १० रुपयांना एक लिंबू खरेदी करणे ही बाब अतिशय छोटी आहे, जास्त मूल्य वाटत नसेल. पण शेतकरी-शेतमजुरांच्या अर्थकारणात खूप मोठा फरक पडतो. शेतकरी-कष्टकरी यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही. त्यामुळे कुटुंबिक अर्थकारण पूर्णपणे कोसरळते.

पुण्याच्या मार्केट यार्डमध्ये २ रुपयाला १ लिंबू असा भाव आहे. तर कोल्हापूर येथे १ रुपयाला १ असा भाव आहे. क्विंटलच्या भाषेत कमीत कमी २ हजार रुपये , तर जास्तीत जास्त ५ हजार रुपये



क्विंटल असा भाव आहे. क्विंटलमध्ये किती लिंबू बसत असतील याची कल्पना नाही. शेतकऱ्यांकडून व्यापारी खरेदी करताना क्विंटलमध्ये खरेदी करणार. मात्र विक्री करताना नगा प्रमाणे विक्री करणार. येथेच उत्पादक घटक (शेतकरी वगळून) नफा कमावण्याचे अर्थकारण उभे राहिलेले दिसून येते.

उन्हाचे दिवस असल्याने फळ धारण क्षमता झाडामध्ये कमी असते. जर फळ लागले तर रोगराई, हवामान बदल, तापमान वाढ, उन्हाच्या झळा, पाणी पुरवठा, वाहतूक , नासाडी, साठवण, मजूर खर्च अशा विविध संकटांपासून तळहाताच्या फोडाप्रमाणे जपणूक करून फळाची वाढ करावी लागते. तेव्हा कोठे एका लिंबाला कोवडीमोल २ रुपये भाव मिळतो.

लिंबू या शेतमालाची मूल्यसाखळी निर्माण होऊ न देण्यामागे अशी व्यापारी लॉबी आहे हे निश्चित. जर मूल्यसाखळी निर्माण झाली तर शेतकऱ्यांना योग्य तो परतावा मिळण्याची शक्यता निर्माण होते. शिवाय प्रकिया उद्योग देखील निर्माण होणे आवश्यक आहे. हा प्रकिया उदयोग शेतकऱ्यांनी एकत्र येत उभा करणे गरजेचा आहे. छोटे छोटे प्रकिया उद्योग गावपातळीवर निर्माण होऊ न देण्यामागे राजकीय हितसंबंध आहेत. शेतमालाचे राजकीय अर्थकारण एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला ग्राहक केंद्रित धोरण आहे. या दोन्हीमध्ये भरडला जातोय तो शेतकरी.

प्रश्न असा आहे की उत्पादन खर्च कसा काढायचा.एमएसपी नुसार काढायचा की प्रत्यक्ष होणारा खर्च पकडायचा?. शेतकऱ्यांना श्रम, शेतीचे भाडे व इतर खर्च पकडायचा का? हा पकडला तर गुंतवणुकीचा परतावा देखील मिळत नाही. तो नाही पडकला तर कटकट होते. अर्थात किलोला ४० ते ५० रुपये शेतकऱ्यांना खर्च येतोच.

यासाठीच मूल्यसाखळी व्यवस्था निर्माण करावी लागेल. त्यावर नियंत्रण आणि नफा शेअर करण्याची तरतूद असणे गरजेचे आहे. शेतमाल विकला की त्याचा संबंध संपला असे जे होते, ते न होता, नफ्याचा काही भाग परतावा म्हणून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. यासाठी प्रथम सरकारला स्वत: गुंतवणूक करावी लागेल. अनुदान ऐवजी ही गुंतवणूक करणे कधीही शाश्वत आहे असे वाटते.

लोकसंसद

## टँकरमुक्त महाराष्ट्राचे केवळ स्वप्नच?

एप्रिल महिन्यापासूनच महाराष्ट्रात पाणीटंचाईच्या तीव्र झळा बसू लागल्या असून सध्याच्या घडीला दोन हजार गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची परिस्थिती ओढवली आहे. तीव्र पाणीटंचाईमुळे हताश झालेले गावा-खेड्याकडचे लोक पिण्याच्या पाण्यासाठी दाही दिशांना वणवण भटकत आहेत आणि गावात टँकर येताच हंडे कळशी घेऊन विहिरीवर प्रचंड गर्दी करत आहेत. येत्या काळात उन्हाचा पारा अधिक वाढल्यानंतर पाण्याची टंचाई अधिक तीव्र होत जाईल आणि त्यामुळे टँकरच्या संख्येत झपाट्याने वाढ होत जाईल. राज्यातील अनेक आदिवासी पाडे आणि गावात उन्हाळ्यात विहिरी कोरड्या पडल्या असून लोक टँकर कधी येणार याकडे चातकासारखी वाट पाहत बसलेले असतात. वास्तविक स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी अनेक सरकारी योजना असून त्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. महाराष्ट्र टँकरमुक्त करण्याच्या घोषणाही वेळोवेळी केल्या जातात. पण अजूनही राज्य टँकरमुक्त झालेले नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र टँकरमुक्त करण्यासाठी पाणी टंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे झाले आहे.

**-प्रदीप शंकर मोरे**

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**तेरा एप्रिल**

कवी, लेखक, संवादक दुर्मिळ ग्रंथाचे संशोधक अनंत काकबा प्रियोळखर यांचा जन्म ५ सप्टेंबर १८९५ रोजी झाला. गोमंतकातील प्रियोळ हे या घराण्याचे मूळ गाव. अनंत प्रियोळकर यांचे प्राथमिक शिक्षण घरीच झाले तर अल्मेडा कॉलेजमधून मॅट्रिक व सांगली येथून ते बी.ए. झाले. त्यांच्या वडिलांचे नाव नागेश पण त्यांना सर्वजण काका म्हणत, त्याचेच आदरार्थी रुप काकबा असे झाले. ते बी.ए.ला असतानाच त्याचे लेख विविध ज्ञानविस्तार मधून प्रसिद्ध होऊ लागले.' अरुणोदय बीए' या नावाने त्यांनी काव्यलेखन केले. पुढे काही काळ मास्तरकी त्यानंतर विविध ज्ञानविस्तारमध्ये सहसंपादक आणि शेवटी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीत ते रुजू झाले.

आपली नोकरी सांभाळून त्यांनी मराठी साहित्याची विपूल सेवा केली. रघुनाथ पंडित विरचित दमयंती स्वयंवर या ग्रंथाला मुंबई विद्यापीठाचा पुरस्कार मिळाला. आणि त्यांच्या संशोधन कार्याला मान्यता मिळाली. यानंतर गोमंतकाची सरस्वती, पिताजी तोमस स्टीफनकृत ख्रिस्तपुराण, मुक्तेश्वरकृत महाभारत, कवीवर्य मोरोपंताचे समग्र ग्रंथ, मराठी दोलमुद्रिते, महाराष्ट्र कवीवर्य मोरोपंतकृत गीते, मुसलमानांची जुनी मराठी कविता आणि मराठी संशोधक - खंड १ व २ यांचे संपादन असे लेखन त्यांनी केले. १९३५ ते ७० या ३५ वर्षांच्या कालखंडात ५० पुस्तके त्यांनी लिहिली. मराठी संशोधक मंडळाचे संचालक म्हणून त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. एकंदरीत त्यांनी मराठी संस्कृतीच्या बिगरराजकीय इतिहासाचे दालन तब्बल ५० महत्वाच्या पुस्तकांनीशी समृदध केले. उदाहरण दयायचे झाल्यास रावबहादूर दादोबा पांडुरंग तडर्खडकर, भाऊ दाजी लाड अशा इतिहास पुरुषांचा चरित्रवेध त्यांनी घेतला. आपल्या संशोधन संपादनातून मराठीचे वैविध्य समोर आणणाऱ्या या महान लेखकाचे १३ एप्रिल १९७३ रोजी त्यांचे निधन झाले.

**१९००:-** लेखक, पत्रकार आणि 'जगन्मित्र' या छापखान्याचे व याच नावाच्या साप्ताहिकाचे संस्थापक संपादक जनार्दन हरी आठल्ये यांचे निधन. त्यांचा छापखाना त्या काळी रत्नागिरीचे गॅझेट म्हणून ओळखला जात असे. जनार्दनपंतांनी 'बालवैद्य' हे गर्भधारणा, प्रसुती यावर माहिती देणारे पुस्तक तसेच 'शब्दसिध्दी निबंध' मधून संस्कृत धातूवरुन मराठा शब्द कसे निर्माण झाले हे दाखवणारा धातूकोश आणि 'बृहत्संहिता' हा वराहमिहिराच्या संस्कृत ग्रंथाचे भाषांतर या पुस्तकांसह 'धर्मशास्त्राप्रमाणे यथाकाली कर्मे करण्यास निरयनगणनाचे 'योग्य कशी' हा शोधनिबंध प्रसिध्द.

**१९११:-** कथालेखिका मालती माधव दांडेकर यांचा जन्म. पूर्वाश्रमीच्या अंबू निजसुरे. यांचे १५हून अधिक कथासंग्रह प्रसिध्द. याशिवाय 'काटेरी मार्ग','वास्तु', 'जिद्द', 'चक्रवती' या कादंबऱ्या, तसेच 'संगीत संस्कार','पर्वकाल ये नवा' ही नाटके, 'भावी गृहिणी अर्थात उद्याची कन्याफ‌ङ्आकर्षक संसारफ‌ङ्कन्येस सप्रेम पत्रफ 'मराठी कादंबरीतील अष्ट नायिका','अमोल आहेर' अशी पुस्तके प्रकाशित.

**१९१३:-** काव्य, नाटय, वाचन, कथा, रहस्यकथा, होमिओपॅथी औषधे, भाज्या, फळे, पकवान्ने, खेळ, बुध्दीबळ, छायाचित्रकला व प्रवास या विषयांचे व्यासंगी लेखक व स्वातंत्र्यसेनानी, समाजसेवक दत्ताजी ताम्हणे यांचा जन्म. दत्ताजी ताम्हणे यांनी 'लोकमित्र' हे साप्ताहिक संपादित केले. कुळकायद्यावर त्यांनी 'कळीचा घोडा' हे पुस्तक लिहिले.

**१९२६:-** लेखिका, कथाकथनकार,'सह्याद्री' मासिकाच्या बालविभागाच्या संपादिका, शैलजा प्रसन्नकुमार राजे यांचा जन्म. लेखनाची सुरुवात आकाशवाणीवर बालवाङ्‌मयाने. ह्यांच्या बालसाहित्यात 'अखेरची दहा मिनिटे','सोन्याचा बूट' मिळून दहाहून अधिक पुस्तकांसह 'अंगत पंगत','गोड गोड वाणी' ही बालगीते. याशिवाय 'खणानारळाची ओटी','नीलांबर', 'नंदू','हितगूज' हे ललित. 'अशी ही मदनरती भेटली','आत','आसवांची पालखी' मिळून ५० हून अधिक कथासंग्रह याखेरीज 'अधुरी कहाणी', 'आभास','चौकट','संचित' मिळून पन्नासच्या आसपास कादंबऱ्या अशी विपूल साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे.

**१९३७:-** विविध वृत्तपत्रातून २००हून अधिक विज्ञानविषयक लेख लिहिणारे लेखक डॉ.मधुकर यशवंत आपटे यांचा जन्म. ह्यांनी खगोलविषयक परिचयफ 'भारतीय राशी आणि नक्षत्र','भारतीय अवकाश संशोधन',ङ्आपली सूर्यमालाफ 'जगप्रसिध्द खगोल शास्त्रज्ञ','खगोलशास्त्राचे अंतरंग', तसेच 'वेध विज्ञानाचा','विज्ञान सरीता','विज्ञान परिचय' मिळून १५हून अधिक पुस्तके प्रकाशित.

**१९५१:-** औंध संस्थानचे अधिपती भवानराव श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी (बाळासाहेब) यांचे निधन. इंदूर येथे १९३५मध्ये झालेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. प्रामुख्याने व्यायाम-प्रसाराची आणि १४ पौराणिक व १४ ऐतिहासिक आख्यानांची पुस्तके त्यांनी लिहिली असली, तरी 'शूर शिपाई' या सामाजिक कांदबरीचेही लेखन त्यांनी केले. मराठी साहित्यानेच नव्हे तर संस्कृतीने आठवावे असे त्यांचे कर्तृत्व म्हणजे, 'चित्ररामायण' या चित्रमालिकेतून त्यांनी आजच्या 'ग्रफिक नॉव्हेल'(चित्रकादंबरी) प्रमाणे रामायणातील सर्ग कमी शब्दांनिशी, चित्रांतून उलगडले होते.

**१९६६:-** लेखक प्रा. डॉ. अनिल सेवकराम नितनवरे यांचा जन्म. ह्यांचा 'नामांतर','स्वप्न आणि सत्य','स्वप्न आणि सत्य' तसेच धम्मराष्ट्राची घटना हा वैचारिक आणि 'सुर्वे गेले त्याची गोष्ट' हा संपादित ग्रंथ प्रकाशित झाला आहे.

**१९७३:-** मराठी संस्कृतीच्या बिगरराजकीय इतिहासाचे दालन तब्बल ५० महत्त्वाच्या पुस्तकानिशी समृध्द, संपन्न करणारे संशोधक अनंत काकबा प्रियोळकर यांचे निधन. रावबहादूर दादोबा पांडुरंग तर्खडकर, भाऊ दाजी लाड अशा इतिहासपुरुषांचा चरित्रवेध प्रियोळकरांनी घेतला; तसेच मोरोपंत, मुक्तेश्वर, रघुनाथपंडित आदी पंतकवींची संपादने उपलब्ध करून दिली. 'मुसलमांनाची जुनी मराठी कविताफ 'फादर स्टीफन्सचे ख्रिस्तपुराण','गोमंतकाची सरस्वतीफ अशा संशोधन-संपादनांतून मराठीचे वैविध्य समोर आले.

**संजय वझरेकर ९९७५५७६६७५**




# ‘विरोधकांच्या मागे केंद्रीय यंत्रणा लावणे भाजपाची नवी संस्कृती’

## शिंदे गटाच्या खासदाराचा भाजपावर घणाघात



। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईच्या उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाने अमोल किर्तीकर यांना उमेदवारी दिली आहे. अमोल किर्तीकर यांच्यावर कोरोना काळात खिचडी वाटपात गैरव्यवहार केल्याप्रकरणी ईडीची चौकशी सुरू आहे. तर दुसऱ्या बाजूला अमोल किर्तीकर यांचे वडील विद्यमान खा. गजानन किर्तीकर हे शिंदे गटात गेलेले आहेत.

लोकसभा निवडणूक प्रचाराच्या धामधुमीत त्यांनी महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी प्रचार करू, असे दोनच दिवसांपूर्वी जाहीर केले होते. मात्र, गुरुवारी (दि. १२) गोरेगावमध्ये झालेल्या एका प्रचारसभेत त्यांनी मुलगा अमोल किर्तीकर यांच्यावर झालेल्या ईडी कारवाईचा निषेध केला. तसेच पंतप्रधान मोदींवर शरसंधान साधले.

प्रचारसभेत बोलताना ते म्हणाले, शिवसेनेत मला ५७ वर्ष झाली. पण मी कधी लबाडी किंवा कपट-करस्थान मी कधीच केलं नाही. अमोल किर्तीकर विरोधात मी प्रचार करणार हे जाहीर केले होते, त्याप्रमाणे मी त्यांच्याविरोधात प्रचार करणार आहेच. पण अमोल किर्तीकर यांच्याविरोधात सुरू असलेल्या ईडी चौकशीतून काहीही निष्पन्न होणार नाही.

भाजपाने यंदा ‘४०० पार’ असा नारा दिला आहे. त्यांनी ४०० जागांऐवजी संसदच ताब्यात घ्यावी, पण दुसऱ्या बाजूला विरोधकांचाही सन्मान ठेवावा, अशा शब्दात त्यांनी भाजपावर शरसंधान साधले. विरोधकांच्या मागे केंद्रीय यंत्रणांचा ससेमिरा लावणे, ही भाजपाने आणलेली नवी संस्कृती असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

किर्तीकर यांच्या भाषणानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी त्याचा आधार घेत भाजपावर टीका केली. एकनाथ शिंदे यांच्या गटाला कशाचा धाक दाखवून आपल्याबरोबर घेतले गेले, याचा अनुभव किर्तीकर यांनी सांगितला आहे. किर्तीकर यांचं म्हणणं फार महत्त्वाचं आहे. महाराष्ट्रात पक्ष फोडण्याचं काम कसं झाले, हे किर्तीकर यांनी त्यांच्या शब्दात सांगितले आहे. त्यामुळे महाराष्ट्राने त्यांचे विधान गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

## उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच प्रचार

**पालघर :** पालघर लोकसभा जागेसंदर्भात महायुतीमधील भाजप व शिवसेनेतील तिढा सुटला नसल्याने अद्याप उमेदवारी जाहीर झालेली नाही. तरीदेखील विद्यमान खा. राजेंद्र गावित यांनी वरिष्ठांच्या सूचनेप्रमाणे स्थानिक नेतेमंडळींच्या वैयक्तिक गाठीभेटी घेत प्रचाराला सुरुवात केली आहे. शिवसेनेमधून निवडून आलेल्या राजेंद्र गावित हे उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पालघरची जागा शिवसेनेकडे राखून ठेवण्यात येते की भाजप या जागेवर दावा करतो याबाबत अनिश्चितता आहे. गावित यांच्याविषयी महायुती पक्षातील नेते मंडळी व नागरिकांमध्ये असलेल्या नाराजीबाबत अहवाल वरिष्ठांकडे प्राप्त झाल्याने त्यांच्या उमेदवारीबाबतची घोषणा लांबणीवर पडली आहे, असे सांगण्यात येते.

# अमरावतीत राजकीय निष्ठांचा लपंडाव

। अमरावती । प्रतिनिधी ।

गेल्या पाच वर्षांतील राजकीय मोडतोडीनंतर लोकसभा निवडणुकीसाठी तयार झालेल्या गोतावळ्यात प्रमुख पक्षांच्या नेत्यांची तोंडे चार दिशांनी असल्याचे चित्र दिसून आले आहे. अनेकांनी पक्ष बदलले आहेत, तर काहींनी पक्ष न बदलताही विरोधाचा सूर आवळला आहे. राजकीय निष्ठांच्या या लपंडावात अमरावतीतील उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे.

भाजपच्या उमेदवार नवनीत राणा या गेल्या निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर निवडून आल्या होत्या. त्यांनी प्रतिस्पर्धी शिवसेनेचे आनंदराव अडसूळ यांचा पराभव केला होता. आनंदराव अडसूळ शिवसेना एकनाथ शिंदे गटात म्हणजे महायुतीत असले, तरी ते राणा यांच्या विरोधात आहेत. प्रहार जनशक्ती पक्षाचे आ. बच्चू कडू हे महायुतीत आहेत, पण त्यांनी राणा यांच्या विरोधात प्रहारतर्फे दिनेश बुब यांना उमेदवारी दिली आहे. गेल्या निवडणुकीच्या वेळी प्रहारचे आ. राजकुमार पटेल हे भाजपमध्ये होते, पण त्यावेळी त्यांनी राणांचा प्रचार केला होता. ते आता राणांच्या विरोधात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गट नेते संजय खोडके २०१४ च्या निवडणुकीच्या वेळी नवनीत राणा



यांच्या विरोधात बंडाचे निशाण फडकवून पक्षातून बाहेर पडले होते. २०१९ च्या निवडणुकीच्या वेळी ते राष्ट्रवादीत परतले, पण ते राणांच्या प्रचारापासून दूर होते.

गेल्या पाच वर्षांमध्ये पुलाखालून बरेचसे पाणी वाहून गेले असले, तरी राजकीय प्रतिस्पर्धेचे अनेक संदर्भ बदललेले नाहीत. २०१४ च्या निवडणुकीच्या वेळी संजय खोडके यांनी तत्कालीन बसपचे उमेदवार गुणवंत देवपारे यांना पाठिंबा दिला होता.

२०१९ च्या निवडणुकीच्या वेळी संजय खोडके यांनी आपली तलवार म्यान केली होती, तरीही राणा यांच्या प्रचारात ते सहभागी झाले नव्हते. यावेळी महायुतीत असूनही त्यांचा राणाविरोध कायम आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गट, प्रहार जनशक्ती पक्ष आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या विरोधातून त्यांना वाटचाल करावी लागत आहे.

# सातारा पुन्हा इतिहास घडवेल

। सातारा । प्रतिनिधी ।

माझ्यासमोर कोण उमेदवार आहे, तो मी पाहिलेला नाही. माझी त्यांच्याशी स्पर्धा नसून माझी लढाई तत्त्वाची आणि महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी आहे. जिल्ह्यातील जनतेला बदल हवा असून, या जनतेच्या ताकदीवर ही निवडणूक मी लढत आहे. खा. शरद पवार यांच्यासह महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे, राहुल गांधी यांच्या माध्यमातून सातारा जिल्हा पुन्हा एकदा इतिहास घडवेल आणि शरद पवार यांचा जिल्हा पुन्हा अबाधित राहील, असा विश्वास आ. शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केला. सातारा लोकसभेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार शशिकांत शिंदे यांचे जिल्ह्यात आगमन झाले. यावेळी त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. शशिकांत शिंदे म्हणाले, शरद पवार यांचा आदेश आल्यानंतर मी तत्काळ निवडणुकीत उतरलो आहे. जिल्ह्यातील जनतेत मोठ्या प्रमाणात उठाव असून, जनतेच्या ताकदीवर ही निवडणूक लढत आहे. त्याचा परिणाम पाहायला मिळेल.जिल्ह्यात प्रवेश करताना तरुण, सामान्य शेतकरी आणि सातारकरांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. लोकांच्या मनात जे काही आहे, त्यातून हा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

### वे|ध|क

## भिवंडीत तिरंगी होणार लढत

**बदलापूर :** भिवंडीत तिरंगी लढत होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. भाजपचे उमेदवार कपिल पाटील यांच्या समोर आघाडीतर्फे सुरेश म्हात्रे यांना उमेदवारी घोषित केली होती. या जागेवर जिजाऊ संघटनेचे निलेश सांबरे काँग्रेसतर्फे इच्छुक होते. मात्र ही जागा राष्ट्रवादीच्या वाट्याला गेल्याने निलेश सांबरे यांनी वंचित बहुजन आघाडीतर्फे उमेदवारी मिळवली. त्यामुळे कपिल पाटील यांच्यासमोर आता सांबरे यांचेही आव्हान उभे टाकले आहे.

## औरंगाबादचा तिढा अजूनही कायम

**छ. संभाजीनगर :** मराठवाड्यातील आठपैकी सात मतदारसंघातील प्रमुख पक्षाचे उमेदवार जाहीर झाले आहेत. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे घोडे अडलेलेच आहे. ही जागा शिवसेनेच्या शिंदे गटाला सुटली आणि उमेदवारांची नावे बदलत गेली. विनोद पाटील, संदीपान भुमरे, राजेंद्र जंजाळ यांची नाव चर्चेत आले. पण उमेदवाराचे नाव काही जाहीर होत नसल्याने महायुतीमध्ये प्रचार शांतता आहे. एक दोन दिवसात त्यांची उमेदवारी जाहीर होईल असे सांगण्यात आले.

# लोकसभेच्या रिंगणात उमेदवारांची उणीदुणी

## विकासावर बोलण्याची मतदारांची अपेक्षा

। यवतमाळ । वृत्तसंस्था ।




जिल्ह्यात २६ एप्रिल रोजी लोकसभेकरिता मतदान होत आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर यवतमाळ आणि वाशीम या दोन्ही जिल्ह्यांत प्रचाराचा शुभारंभ झाला. पहिल्याच दिवशी महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विविध अनुभवांना सामोरे जावे लागले.

महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्यावर त्या स्थानिक उमेदवार नसल्याचा आरोप महाविकास आघाडीकडून होत आहे, तर महाविकास आघाडीचे उमेदवार संजय देशमुख हे स्वत:ला कुणबी असल्याचे सांगून मतदारांची फसवणूक करीत असल्याचा थेट आरोप महायुती उमेदवाराच्या प्रचारसभेत मंचावरून झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

महायुती आणि आघाडीच्या उमेदवारांकडे विकासाच्या चर्चेवर निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी कुठलेचे मुद्दे नाहीत. दोन्ही उमेदवार प्रथमच थेट लोकसभेच्या रिंगणात उतरल्याने यापूर्वी त्यांनी मतदारसंघासाठी काय केले, याचा कोणताच लेखाजोखा दोन्ही उमदेवारांकडे नाही.

दुसरीकडे, महायुतीच्या दिग्रस येथील सभेत बोलताना महायुतीचे समर्थक अबू पाटील यांनी, कुणब्यांना संपविणारा लबाड व्यक्ती म्हणजे संजय देशमुख, असा थेट वार केला. आमदार असताना त्यांनी समाजाला सर्वाधिक त्रास दिला, अशी खंत बोलून दाखविली. लोकांच्या मतांसाठी ते कुणबी असल्याचे खोटे सांगून फसवित असल्याचा आरोपही पाटील यांनी देशमुख यांच्यावर केला आहे. या दोन्ही प्रसंगांच्या चित्रफिती जिल्ह्यात प्रचंड प्रसारित झाल्या असून, यावरून नागरिकांमध्ये विविध चर्चा सुरू आहेत.

# ‘वंचितला मतदान करू नका’

। मुंबई । प्रतिनिधी ।

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची मविआशी जागावाटपाची चर्चा निष्फळ ठरल्यानंतर वेगळी चूल मांडत स्वतंत्र निवडणूक लढविण्याची घोषणा केली. तसेच त्यांनी मविआच्या विरोधात उमेदवारही उभे केले. त्यांच्या या निर्णयावर मविआकडून सावध भूमिका घेण्यात आली. मात्र, महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी मात्र, वंचित बहुजन आघाडीच्या पवित्र्यावर सडकून टीका केली आहे. त्यामुळे इतिहासातील प्रसिद्ध अशा आंबेडकर विरुद्ध गांधी या वादाची पुन्हा एकदा महाराष्ट्राला आठवण झाली.

## मीरा-भाईंदर पदाधिकाऱ्यांचा ठाकरे गटामध्ये प्रवेश

। भाईंदर । प्रतिनिधी ।

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिल्यामुळे पक्षातील कार्यकर्ते नाराज झाले असताना आता दुसरीकडे भाजपामधील उत्तर भारतीय कार्यकर्ते देखील नाराज झाले आहेत. ठाकरे महायुतीमध्ये आल्यामुळे मीरा-भाईंदर पदाधिकारी पदाधिकाऱ्यांनी पदाचा राजीनामा देत ठाकरे गटात प्रवेश केला आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी महायुतीला दिलेला बिनशर्थ पाठिंबा खुद्द पक्षाच्या कार्यकर्त्यांनाच रुचलेला नाही. यामुळे मीरा-भाईंदर भाजपाच्या ४० पदाधिकाऱ्यांनी शिवसेना ठाकरे गटामध्ये प्रवेश केला आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल **सौ. इंदुमती शिवाजी चौधरी व सौ. लता हरिश्चंद्र विशे** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक **श्री. गजानन रघुनाथ लखमले व सौ. वैष्णवी गजानन लखामले** यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे.पाषाणे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ६ | ११ | ०-१०-००<br>पो.ख. ०-०२-०० | ०-११ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **चौदा दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. १३/०४/२०२४.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राह्मणआळी, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९३२५०६००३७.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविणेत येते की, श्री. रघुनाथ नवश्या वालेकर रा. वावळोली पो.सिध्देश्वर, ता.सुधागड यांनी या कार्यालयात त्यांची भाची शांती सोनू हिलम हिच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदर अर्जात त्यांनी तिचा जन्म दि. ०१/०७/२०१९ रोजी मौजे वावळोली, ता.सुधागड येथे झाला आहे परंतु त्याची नोंद अद्यापर्यंत केली नाही असे नमुद केले आहे.

सदरहू शांती सोनू हिलम यांच्या जन्म नोंदीचा तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय सुधागड पाली येथे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसव्दारे प्रसिध्द करणेत येत आहे.

सदर नोटीस आज ०४/०४/२०२४ रोजी पेपर नोटीस प्रसिध्दीकरीता माझ्या सही व शिक्कानिशी दिली आहे.

ठिकाण:- सुधागड पाली
दिनांक :- ०४/०४/२०२४

सही/-
**(उत्तम कुंभार)**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

### जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती वैभवी विपीन पाटील याच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे गणेगाव चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३४/२/अ एकुण २.०५.०० गुंठे पैकी त्याचे हिश्याचे क्षेत्र ०.२४.४२ जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक १३/०४/२०२४

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत त्यांच्या मालकाकडून विकसनाकरीता घेतलेली आहे.

**मौजे-भिसेगाव, तालुका- कर्जत, जि.-रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १. प्रकाश प्यारेलाल परमार,<br>२. सचिन चंपालाल ओसवाल,<br>३. सुचित चंपालाल ओसवाल | ४८/१/अ | १ | ०-१८-१० | ०-८० |

तरी सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकसनाकरीता देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील जमीन मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकसनाकरीता देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण दान बक्षीस, फरोक्त साठेकरार मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल विकसनाचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. १३/०४/२०२४

अधिवक्ता
**स्वप्निल बाबूराव देशमूख**
ऑफिस पत्ता. शॉप नं. २४, मार्वल क्षिप्रा मुद्रे खुर्द ता. कर्जत
जि. रायगड ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक सौ.मधुमती मारुती वरसोलकर वगैरे, रा. आक्षी, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या खुद्द मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| आक्षी ता.अलिबाग | ३०५ | - | ०-८२-० | १८.०० |

या मिळकतीपैकी ०-०५-८० हे. आर. बागायत मिळकत

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०४/२०२४

सही / -
**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड,

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. व्यंकटेश कृष्णन अय्यर व सौ. मिना व्यंकटेश अय्यर रा. शिवाजी पार्क, दादर-मुंबई यांनी खालील वर्णनांची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. चंद्रकांत काशिनाथ घरत वगैरे-४ रा. खरोशी, पेण-रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्य क्षेत्रातील तलाठी सजा-जिर्णे मौजे-जिर्णे येथील गट नं. १९५ क्षेत्र ३-२४-०० हे.आर.चौ.मी. आकार रु. ४-३४ पैसे ही जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाले दिवशी पासून १५ (पंधरा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ३-२४-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण- रायगड.
दि. १३/०४/२०२४.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील.**
परमार प्लान शॉप नं. १६, तळ मजला शिवाजी
पथ पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सुदाम रामा जोशी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-
मौजे-हेदवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| भूमापन क्रं व उपविभाग /सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७३/१/अ | एकुण क्षेत्र ०-५२-०० हे आर पॉ यापैकी ०-२७-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-३७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पाच दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/०४/२०२४
मोबा. ९८२२६९११०९

**ॲड. निलेश कान्हु मोरे**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस
समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. मिना व्यंकटेश अय्यर व श्री. व्यंकटेश कृष्णन अय्यर रा. शिवाजी पार्क, दादर-मुंबई. यांनी खालील वर्णनांची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. चंद्रकांत काशिनाथ घरत वगैरे २ रा. खरोशी, पेण-रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्य क्षेत्रातील तलाठी सजा-जिर्णे मौजे-जिर्णे येथील गट नं. १९७ क्षेत्र १-६७-०० हे.आर.चौ.मी. आकार रु. २-१९ पैसे ही जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाले दिवशी पासून १५ (पंधरा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची १-६७-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण- रायगड.
दि. १३/०४/२०२४.

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील.**
परमार प्लाझा, शॉप नं. १६, तळ मजला,
शिवाजी पथ. पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## निवडक

### ‘राशीद भरवशाचा खेळाडू’

**नवी दिल्ली :** राशीद खान हा क्रिकेटच्या तिन्ही बाबींमध्ये सर्वस्व पणाला लावतो. फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण यामध्ये झोकून देतो. शारीरिक दुखापतीकडेही तो लक्ष देत नाही. अन् याच कारणामुळे तो भरवशाचा क्रिकेटपटू ठरतो. त्यामुळेच जगभरातील टी-२० लीगमध्ये त्याला सर्वाधिक पसंती असते, अशा शब्दात भारताचे महान खेळाडू सुनील गावसकर यांनी राशीद खानच्या खेळाचे कौतुक केले आहे. तो प्रत्येक बाबींमध्ये १०० टक्के देण्याचा प्रयत्न करतो, असे गावसकर म्हणाले.

### सिम्पसन यांचे निधन

**अमेरिका :** माजी अमेरिकन फुटबॉलपटू आणि अभिनेते ओ.जे. सिम्पसन यांचं निधन झालं आहे. त्यांच्या कुटुंबियांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून याची पुष्टी केली. सिम्पसन यांनी वयाच्या ७६ व्या वर्षी कॅन्सरमुळे अखेरचा श्वास घेतला. सिम्पसनवर पत्नी आणि तिच्या मित्राची हत्या केल्याचा आरोप होता. त्यांना खुनाच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात आलं. १० एप्रिल रोजी आमचे वडील ओरेंथल जेम्स सिम्पसन कर्करोगाशी लढा देताना हे जग सोडून गेले, असं या पोस्टमध्ये लिहिलंय.

### कार्तिक विश्वचषक खेळणार?

**मुंबई :** मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू यांच्यात ११ एप्रिल रोजी वानखेडे स्टेडियमवर सामना खेळला गेला. कार्तिकने वयाच्या ३८ व्या वर्षी अप्रतिम खेळी करून क्रिकेट चाहत्यांना आपले चाहते बनवले आहे. मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात कार्तिकने नाबाद ५३ धावा केल्या.दरम्यान, जेव्हा तो स्टायलिश शॉट्स खेळत होता, तेव्हा रोहित शर्मा त्याच्याकडे गेला आणि टाळ्या वाजवत म्हणाला शाब्बास डीके, विश्वचषक खेळायचा आहे, विश्वचषक. यानंतर तो हसताना दिसत आहे.

### आरसीबी प्लेऑफमध्ये?

**मुंबई :** आरसीबीने आतापर्यंत ६ सामने खेळले आहेत. एक संघ साखळी टप्प्यात १४ सामने खेळतो, त्यामुळे संघाला अजून ८ सामने खेळायचे आहेत. आतापर्यंत आरसीबीचा संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडलेला नाही.प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी कोणत्याही संघाला किमान १६ गुणांची आवश्यकता असते. आरसीबीचे सध्या २ गुण आहेत.आरसीबीने आतापर्यंत ६ सामने खेळले असून त्यांना आणखी ८ सामने खेळायचे आहेत. अशा परिस्थितीत संघाला आता उत्कृष्ट कामगिरी दाखवावी लागेल.

### मयंक सामन्यांमधून बाहेर

**लखनौ :** लखनौ सुपरजायंट्सचा वेगवान गोलंदाज मयंक यादव पुढील दोन सामने खेळू शकणार नाही. प्रशिक्षक लँगर म्हणाले की, आम्हाला आशा आहे की तो १९ एप्रिलपर्यंत तंदुरुस्त होईल. त्याने प्रत्येक सामना खेळावा अशी आमची इच्छा आहे. लँगर पुढे म्हणाले की,गुजरात विरुद्धच्या सामन्यात एक षटक टाकल्यानंतर त्याला हिप स्टिफनेसची समस्या जाणवली. यानंतर आम्ही त्यांची एमआरआय चाचणी केली, ज्यामध्ये थोडी सूज दिसून आली. तो लवकरच मैदानावर परत येईल अशी आम्हाला आशा आहे.

## जसप्रीत बुमराकडून पाच बळींचा दणका

# मुंबईच्या विजयाचा ‘सूर्य’ तळपला

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**जसप्रीत बुमरा (५/२१) याने भेदक गोलंदाजी केल्यानंतर इशान किशन (६९ धावा) व सूर्यकुमार यादव (५२ धावा) यांनी झळकावलेल्या आक्रमक अर्धशतकांच्या जोरावर मुंबई इंडियन्सने गुरुवारच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरचा सात गडी व २७ चेंडू राखून धुव्वा उडवला. मुंबईने सलग दुसऱ्या विजयाला गवसणी घातली. बंगळूरचा हा पाचवा पराभव ठरला.**

बंगळूरकडून मुंबईसमोर १९७ धावांचे आव्हान ठेवण्यात आले. इशान किशन व रोहित शर्मा या सलामी जोडीने नवव्या षटकात १०१ धावा फटकावत इरादे स्पष्ट केले. इशानच्या झंझावातात बंगळूरच्या गोलंदाजांचा पालापाचोळा झाला. त्याने ३४ चेंडूंमध्ये सात चौकार व पाच षटकारांसह ६९ धावांची खेळी केली. आकाशदीपच्या गोलंदाजीवर तो बाद झाला.दरम्यान, याआधी मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. विराट कोहलीच्या फलंदाजीवर सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या; पण जसप्रीत बुमराच्या गोलंदाजीवर तो तीन धावांवरच इशान किशनकरवी झेलबाद झाला.

आकाश मधवालने विल जॅक्सला आठ धावांवर बाद करीत बंगळूरला दुसरा धक्का दिला. यानंतर मात्र फाफ ड्युप्लेसी व रजत पाटीदार या जोडीने ८२ धावांची भागीदारी करताना मुंबईच्या गोलंदाजांचे आव्हान परतवून लावण्याचा प्रयत्न केला. जेराल्ड कोएत्झी याने पाटीदारला किशनकरवी झेलबाद केले. या लढतीत पाटीदारने २६ चेंडूंमध्ये तीन चौकार व चार षटकारांसह ५० धावांची खेळी केली. अखेर तो फॉर्ममध्ये आला.फिरकी गोलंदाज श्रेयस गोपालने ग्लेन मॅक्सवेलला शून्यावर पायचीत बाद करीत मोठा अडसर दूर केला; पण ड्युप्लेसी व दिनेश कार्तिक यांनी बंगळूरचा डाव सावरला. दोघांनी अप्रतिम फलंदाजी केली. ड्युप्लेसीने ४० चेंडूंमध्ये ६१ धावांची खेळी केली. यामध्ये चार चौकार व तीन षटकारांचा समावेश होता.



### सूर्याचा झंझावात

**इशान बाद झाल्यानंतर इम्पॅक्ट खेळाडू सूर्यकुमार यादव खेळपट्टीवर आला. त्याने अवघ्या १९ चेंडूंमध्ये पाच चौकार व चार षटकारांसह ५२ धावांची धडाकेबाज खेळी केली. विल जॅक्सच्या गोलंदाजीवर रोहित ३८ धावांवर बाद झाला. विजयकुमार वैशाखने सूर्यकुमारला बाद केले. हार्दिक पंड्या (नाबाद २१ धावा) व तिलक वर्मा (नाबाद १६ धावा) यांनी मुंबईच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.**

### कार्तिक व बुमरा चमकले

**बंगळूर फलंदाजी करीत असताना अखेरच्या षटकांमध्ये दिनेश कार्तिक व जसप्रीत बुमरा चमकले. कार्तिकने २३ चेंडूंमध्ये नाबाद ५३ धावांची खेळी साकारताना पाच चौकार व चार षटकारांची आतषबाजी केली. याचदरम्यान बुमराने महिपाल लोमरोर, सौरव चौहान व विजयकुमार वैशाखला बाद करीत ठसा उमटवला. बंगळूरने १९६ धावांपर्यंत मजल मारली.**

## एक्स्ट्रा रिव्यूमुळे फॅन्स खवळले




**। मंबई । वृत्तसंस्था ।**

आरसीबी डावाच्या १७ व्या षटकात ही घटना घडली. ज्यावेळी आरसीबीचा कर्णधार फाफ डू प्लेसिस मैदानावर खेळत होता. आणि मुंबई इंडियन्सकडून जसप्रीत बुमराह गोलंदाजी करत होता. त्याने ऑफ-स्टंपच्या बाहेर एक स्लो बॉल टाकला, जो फॅफ खेळण्यासाठी बाहेर गेला. पण तो हुकला आणि मागे इशान किशनच्या हातात गेला. पण त्यानंतर सर्वांना आश्चर्य वाटले की, मैदानावरील पंच नितीन मेनन यांनी थेट डीआरएस घेण्याचा निर्णय घेतला. पण त्यावेळी मुंबई इंडियन्सचे रिव्ह्यू संपले होते. आणि तरी पण नितीनने यांनी डीआरएस कसा घेतला हा प्रश्न चाहत्यांना पडला.

त्यावेळी फाफ डू प्लेसिसच्या बॅटशी चेंडूचा काही संपर्क झाला असे अंपायर मेनन त्यांना त्यावेळी वाटले. त्यामुळे त्याने रिव्ह्यू घेतला होता, पण सामन्यानंतर सोशल मीडिया अनेकांनी नितीन मेननवर पक्षपातीपणा केल्याचा आरोप केला आहे.आणि पंचाच्या निर्णयाने तसा फारसा फरक पडला नाही. कारण, ला सामन्यात चार षटके शिल्लक असतानाच पराभव पत्करावा लागला. पण नितीन मेनन मोठ्या प्रमाणावर ट्रोल होत आहे.

## प्रज्ञानंदसमोर एबासोव निष्प्रभ

**। टोरंटो । वृत्तसंस्था ।**

भारताच्या पुरुष खेळाडूंनी आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेतील सहाव्या फेरीत उल्लेखनीय कामगिरी केली. आर. प्रज्ञानंद व विदित गुजराथी यांनी प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करीत महत्त्वाचा गुण मिळवला, तर डी. गुकेशने लढत ड्रॉ राखत इयान नेपोनियात्ची याच्यासोबत संयुक्तपणे अव्वल स्थान कायम राखले.

भारताचा युवा स्टार आर. प्रज्ञानंद याने आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेतील सहाव्या फेरीत अझरबैझानच्या निजात एबासोव याच्यावर विजय मिळवला. एबासोव याच्याविरुद्धच्या लढतीत प्रज्ञानंदचे पारडे जड समजले जात होते. प्रत्यक्षात प्रज्ञानंद याने निराशही केले नाही. त्याने अपेक्षेनुसार खेळ करीत एबासोववर वर्चस्व गाजवले. प्रज्ञानंद या लढतीत तांत्रिकदृष्ट्या सरस ठरला, हे विशेष.

विदित गुजराथी याला मागील दोन लढतींत निराशेचा सामना करावा लागला होता; पण बुधवारी मध्यरात्री झालेल्या लढतीत त्याने झोकात पुनरागमन केले. त्याने फ्रान्सच्या फिरॉझा एलिरेझा याला नमवले. गुजराथी याने या लढतीत क्लासिकल पद्धतीने सुरुवात केली. या सुरुवातीचा फायदा त्याला झाला.



### महिला खेळाडूंकडून निराशा

**एकीकडे भारतीय पुरुष खेळाडूंनी बुधवारी रात्री झालेल्या लढतींमध्ये शानदार कामगिरी केली असली, तरी भारताच्या महिला खेळाडूंना निराशेला सामोरे जावे लागले. रशियाच्या कॅटरिना लागनो हिच्याकडून आर. वैशालीचा पराभव झाला. चीनच्या टिंगजी लेई हिने कोनेरू हम्पीला नमवले. महिला विभागात चीनची टॅन झोंगयी ४.५ गुणांसह पहिल्या स्थानावर विराजमान आहे.**

### आव्हानवीरांची बुद्धिबळ स्पर्धा

**पुरुष विभाग क्रमवारी**

**१) डी. गुकेश (४ गुण) १) इयान नेपोनियात्ची (४ गुण) ३) फॅबियानो कॅरुअना (३.५ गुण) ४) आर. प्रज्ञानंद (३.५ गुण) ५) विदित गुजराथी (३ गुण) ६) हिकारू नाकामुरा (३ गुण) ७) एलिरेझा फिरॉझा (१.५ गुण) ८) निजात एबासोव (१.५ गुण).**

### मॅक्सवेलचा खराब विक्रम

**मुंबई :** इंडियन प्रीमीयर लीगचा २५ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बँगलोर आणि मुंबई इंडियन्स या दोन संघांमध्ये खेळला गेला. या सामन्यात आरसीबीचा अष्टपैलू खेळाडू ग्लेन मॅक्सवेलने रोहित शर्माच्या सगळ्यात खराब रेकॉर्डशी बरोबरी केली आहे.

ग्लेन मॅक्सवेल मुंबईविरुद्धच्या सामन्यात शून्यावरच बाद झाला. तो आयपीएल इतिहासात आत्तापर्यंत झीरोवर १७ वेळा बाद झाला आहे. अस करत त्याने रोहित शर्मा आणि दिनेश कार्तिकचे शून्यावर बाद होण्याच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. रोहित शर्मा आणि दिनेश कार्तिक आत्तापर्यंत १७-१७ वेळा ० वर बाद झाले आहेत.

## चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धा

# बार्सिलोनाची पॅरिस सेंट-जर्मेनवर मात



**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

बार्सिलोनाने पिछाडीवरून दमदार पुनरागमन करताना चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या उपांत्यपूर्व फेरीतील पहिल्या टप्प्याच्या सामन्यात पॅरिस सेंट-जर्मेनवर ३-२ अशा फरकाने मात केली. दोन गोल नोंदवणारा ब्राझिलियन आक्रमकपटू राफिनिया बार्सिलोनाच्या विजयाचा शिल्पकार ठरला.

घरच्या मैदानावर खेळणाऱ्या पॅरिस सेंट-जर्मेन संघाने उत्तरार्धाच्या सुरुवातीला २-१ अशी आघाडी मिळवली होती. त्यानंतर बार्सिलोनाचे प्रशिक्षक झावी यांनी काही बदली खेळाडूंना मैदानावर उतरवले. यापैकी मध्यरक्षक पेड्री आणि बचावपटू आंद्रेस ख्रिास्टिन्सन यांनी सामन्यावर मोठा प्रभाव पाडला. प्रथम पेड्रीने दिलेल्या पासवर राफिनियाने बार्सिलोनाला २-२ अशी बरोबरी करून दिली, तर ख्रिास्टिन्सनने हेडर मारून गोल करत बार्सिलोनाला ३-२ अशी आघाडी मिळवून दिली.

बार्सिलोनाकडून राफिनियाने दोन, तर ख्रिास्टिन्सनने एक गोल केला. सेंट-जर्मेनसाठी ओस्मान डेम्बेले आणि विटिनया यांनी प्रत्येकी एक गोल केला. विशेष म्हणजे डेम्बेले बार्सिलोनाचा माजी खेळाडू आहे.बार्सिलोनाचा तारांकित आघाडीपटू रॉबर्ट लेवांडोवस्की आणि सेंट-जर्मेनचा तारांकित आघाडीपटू किलियन एम्बापे यांना फारशी चमक दाखवता आली नाही.

### ॲटलेटिको माद्रिद विजयी

**उपांत्यपूर्व फेरीच्या अन्य एका लढतीत ॲटलेटिको माद्रिदने बुरुसिया डॉर्टमंडवर विजय मिळवला. घरच्या मैदानावर खेळणाऱ्या ॲटलेटिकोने पहिल्या टप्प्यातील हा सामना २-१ असा जिंकला. ॲटलेटिकोसाठी रॉड्रिगो डी पॉल (चौथ्या मिनिटाला) आणि सॅम्युएल लिनो (३२व्या मि.) यांनी, तर डॉर्टमंडसाठी सेबॅस्टियन हालेरने (८१व्या मि.) गोल केला.**

## ऑलिम्पिकआधी ९० मीटर अंतर गाठू शकतो

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सध्या माझी तयारी खूप चांगल्याप्रकारे सुरू आहे आणि या जोरावर आगामी पॅरिस ऑलिम्पिकच्या आधी कधीही मी ९० मीटर दूर भाला फेकू शकतो, असा विश्वास भारताचा गोल्डन बॉय भालाफेकपटू नीरज चोप्रा याने व्यक्त केला.



### नीरज चोप्राने व्यक्त केला विश्वास

नीरजने ८९.९४ मीटरचा आपला वैयक्तिक सर्वोत्तम थ्रो २०२२ साली स्टॉकहोम डायमंड लीगदरम्यान केला होता.नीरजने सराव सत्रामध्ये ९० मीटर अंतर गाठले आहे. मात्र, कोणत्याही स्पर्धेत त्याला या कामगिरीची पुनरावृत्ती करता आलेली नाही. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आपले सुवर्णपदक कायम राखण्याचा निर्धार केलेल्या नीरजने म्हटले की, ममी पॅरिस ऑलिम्पिकआधी ९० मीटर दूर भाला फेकण्याचा पूर्ण प्रयत्न करेन. आशा आहे की, पॅरिस ऑलिम्पिकआधी ही कामगिरी करण्यात यश येईल.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात** वापर केलेला नाही. असे दोन २ BHK फ्लॅटस त्वरीत विकणे आहेत. पहिल्या फ्लॅटची किंमत ७३ लाख व दुसऱ्या फ्लॅटची किंमत ८३ लाख संपर्क : ८६९८६८२१२१
- **भेरसे येथे ३० गुंठे जागा विकणे आहे व** वावे नाक्यावर जागा विकणे आहे. तसेच मुरूड बीचपासून १२ कि.मी. अंतरावर रोडटच १ एकर जागा विकणे आहे. मो. ८२०८२९०६६२/९३७०१२६२५
- **पुरूष रिसेप्शनिस्ट पाहिजे स्विमींग पूल** तासिका/मासिक तत्वावर उपलब्ध. ८३९०४२४२२२/९२७२३८३४७६
- **उजाला विवाह मंडळ, मुंबई उजाला** ज्योतिष क्लासेस, रायगड Mob No.: 9324987050
- **अलिबागमधील सोसायटीमध्ये** वॉचमन कम स्वीपर पाहिजे. संपर्क-८७८८०२१५१०
- **अलिबाग एस.टी.स्टँडजवळ** गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क- ९४२२६९४२०३/९३२२४८५८९८
- **ड्रायव्हर पाहिजे** संपर्क : ९३२२४८५८९८/९४२२६९४२०३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## सिंधू, प्रणोयचे आव्हान संपुष्टात

# आशियाई बॅडमिंटन स्पर्धेत भारत अपयशी

**। निंगबो । वृत्तसंस्था ।**

भारतीय खेळाडूंची आशियाई बॅडमिंटन स्पर्धेतील सुमार कामगिरी गुरुवारीही कायम राहिली. महिला विभागात पी. व्ही. सिंधू व पुरुष विभागात एच. एस. प्रणोय या दोघांचाही पराभव झाला.

चीनच्या हॅन युई हिने सिंधूची कडवी लढत मोडून काढली. चीन तैपईच्या लिन चून यी याने प्रणोय याच्यावर विजय साकारला. पी. व्ही. सिंधू हिने पहिल्या गेममध्ये दमदार सुरुवात केली.

८-४ अशी आघाडी घेणाऱ्या सिंधूने पुढे जाऊन आपला खेळ उंचावला आणि ही आघाडी १४-८ अशी पुढे नेली; मात्र यानंतर हॅन हिने सिंधूकडून झालेल्या चुकांचा फायदा घेतला.

चीनच्या खेळाडूने प्रदीर्घ रॅलीचा खेळ करीत सिंधूला थकवले व १५-१५ अशी बरोबरी साधली. त्यानंतर तिने २१-१८ असा पहिला गेम आपल्या नावावर केला. सिंधूने दुसऱ्या गेममध्ये आक्रमक खेळ केला. तिच्या आक्रमणासमोर हॅन हिचा निभाव लागला नाही. अखेर २१-१३ अशी बाजी मारण्यात सिंधूला यश मिळाले.



### सरळ दोन गेममध्ये मात

**एच. एस. प्रणोय – लिन चून यी यांच्यामधील लढतीत पहिल्या गेममध्ये सुरुवातीला दोन्ही खेळाडूंमध्ये कडवा संघर्ष पाहायला मिळाला; मात्र ब्रेकपर्यंत लिन याने ११–७ अशी आघाडी घेतली. प्रणोयने तोडीस तोड खेळ करीत १५–१५ अशी बरोबरी साधली. लिन याने २१–१८ असा पहिला गेम जिंकताना प्रणोयला मागे टाकले. दुसऱ्या गेममध्ये लिन याने ड्रॉप शॉटस् व आक्रमक स्मॅशेसच्या जोरावर प्रणोयवर वर्चस्व गाजवले.**

## उदित वरिष्ठ अंतिम फेरीत

### आशियाई कुस्ती चॅम्पियनशिप

*। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।*

***युवा कुस्तीपटू उदित पुरुष फ्रीस्टाइलमध्ये ५७ किलो गटाच्या अंतिम फेरीत पोहोचला असून, वरिष्ठ आशियाई चॅम्पियनशिपमध्ये तो विजेतेपदापासून एक पाऊल दूर आहे. तर अन्य तीन भारतीय कुस्तीपटू कांस्यपदकासाठीच्या लढतीत पोहोचले आहेत.उदित अंतिम लढतीत जपानच्या केंटो युमिया याचा सामना करणार आहे.***

*२० वर्षांखालील गटातील आशियाई विजेता उदित याने देशाची या गटातील कामगिरी चांगली राहील हे निश्चित केले. या गटात रवी दहिया आणि अमन सेहरावत या पैलवानांनी काही वर्षांत चांगली कामगिरी केली आहे. भारताने ५७ किलो गटात सलग चारवेळा आशियाई विजेतेपद पटकावले आहे. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता रवीने २०२०, २०२१ मध्ये आणि अमनने २०२३मध्ये सुवर्णपदक जिंकले होते. वरिष्ठ पातळीवरील हे उदितचे दुसरे पदक असेल. त्याने ट्यूनिशियात यूडब्ल्यूडब्ल्यू रँकिंग सिरीजमध्ये रौप्यपदक पटकावले होते. उदितसाठी पहिल्या फेरीतील सामना कठीण होता. त्यात उदितने इराणच्या इब्राहिम माहदी खरी याला १०-८ असे पराभूत केले. त्यानंतर त्याने अल्माज समानबेकोव याला ६-४ असे पराभूत करत उपांत्य फेरीत कोरियाच्या कुम हयोक किम याच्यावर ४-३ असा विजय मिळवला.*


(संग्रहित)





# जादू की झप्पी

**गम्मत ग्यान**

मित्रांनो, सुट्टीच्या दिवसांची मजा लुटताय ना? या निवांत वेळी तुम्हाला मौजमजा करण्याची संधी मिळते. तेव्हा भरपूर मित्र-मैत्रिणी जमवा आणि आनंदाने सुट्टी घालवा. तुम्हाला माहितीये की, खूप दिवसांनी भेटल्यावर आपण एकमेकांना मिठी मारतो. तुम्हीही ते करता. घरातल्या वडिलधाऱ्यांना, भावंडांना प्रेमाने मिठी मारता. यातून तुमचे त्यांच्यावरील प्रेम, स्नेह, आत्मियता व्यक्त होते. मात्र मिठी मारणे हा केवळ एखाद्यावर प्रेम दाखवण्याचा मार्ग नाही तर या कृतीमुळे शरीराला अनेक आरोग्यदायी फायदे देखील होतात. विज्ञानानुसार, दररोज एखाद्याला मिठी मारल्याचे अनेक लाभ सांगितले आहेत. चला तर मग, आज याविषयीच अधिक जाणून घेऊ या.

✻ तुम्ही एखाद्याला मिठी मारता तेव्हा शरीरात ऑक्सिटोसिन हार्मोन्सची पातळी वाढते. खेरीज त्या व्यक्तीशी तुमचे नातेही सुधारते. मिठी मारल्याने तणाव कमी होतो आणि हृदय निरोगी राहण्यासही मदत होते.

✻ एखाद्याला मिठी मारल्याने मज्जासंस्था थंड होण्यास मदत होते. यामुळे तुम्हाला शांतता मिळते आणि तणावही दूर होतो. मिठी मारणे मानसिक आरोग्यासाठीही खूप फायदेशीर मानले जाते.

✻ तणावामुळे झोप कमी होते. अशा स्थितीत जवळच्या माणसाला मिठी मारली तर चांगली झोपही लागते. झोपण्याच्या फक्त १० मिनिटे आधी तुम्ही आई-बाबा, आजी-आजोबा वा ताई-दादाला मिठी मारता तेव्हा झोपेची गुणवत्ता देखील सुधारते.

✻ मिठी मारल्याने शरीरात रक्त आणि ऑक्सिजनचे परिसंचरण वाढते, ज्यामुळे शरीरात ऊर्जा येते. सहाजिकच थकवाही दूर होतो आणि शरीराची कार्येही चांगल्या प्रकारे सुरू होतात.

✻ एखादी व्यक्ती एखाद्याला मिठी मारते तेव्हा ते चांगल्या मूडचे लक्षण असते. यामुळे मिठी मारली आहे त्यांचा मूडही सुधारतो.

✻ एखाद्याला प्रेमाने मिठी मारल्याने शरीराच्या अनेक भागांतील वेदनाही कमी होतात. या काळात एंडोर्फिन हार्मोन्स तयार होते जे वेदना रोखण्यास पुरक असते.

✻ अनेक संशोधनांमध्ये सिद्ध झाले आहे की, मिठी मारल्याने रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होते. तेव्हा घरातील लोकांना वा जवळच्या मित्रमैत्रिणींना दररोज एक 'जादू की झप्पी' द्या आणि निरोगी राहा.

# फन्नाट खेळ

**फन टाईम**



ऑस्ट्रेलियन रूल्स फुटबॉल नावाचा खेळ ऑस्ट्रेलियामध्ये खेळला जातो. त्याला ऑसी रूल्स किंवा फुटी असंही म्हटलं जातं. हा ऑस्ट्रेलियातला व्यावसायिक खेळ आहे सिडनी स्वॅन्स, ब्रिस्बेन लायन्स आणि गोल्ड कोस्ट सन्स हे या खेळातले काही मातब्बर संघ आहेत. या खेळाचं स्वरूप रग्बीसारखं असलं तरी फुटीचे नियम खूपच वेगळे आहेत. या खेळात सॉकर आणि रग्बी यांचं मिश्रण आढळतं. हा खेळ लंबगोल मैदानात खेळला जातो. मार्च ते सप्टेंबर या काळात या खेळाचा हंगाम असतो. वेगवान असा हा खेळ लोकांचं खूप मनोरंजन करतो. ऑस्ट्रेलियात हा खेळ खूपच लोकप्रिय आहे.

**कॅल्सिको फिओरेंटिनो**

कॅल्सिओ फिओरेंटिनो किंवा कॅलिको स्टोरिको हा फुटबॉलचाच एक प्रकार आहे. हा खेळ इटलीमध्ये खेळला जातो. चौदा ते सोळाव्या शतकादरम्यान या खेळाचा उदय झाला असण्याची शक्यता व्यक्त होते. सॉकर, रग्बी आणि एमएमए या खेळांचं मिश्रण यात पहायला मिळतं. हा खेळ मातीमध्ये खेळला जातो. जास्तीत जास्त गोल करणं हे यात सहभागी होणाऱ्या संघांचं उद्दिष्ट असतं. फ्लोरेन्समधल्या पिआझ्झा सांता क्रॉस इथे हा खेळ खेळला जातो. जूनच्या तिसऱ्या आठवड्यात इथे स्पर्धेचं आयोजन केलं जातं. या खेळाचे सामने ५० मिनिटांचे असतात. प्रत्येक संघात २७ खेळाडू असतात. या खेळात जखमी खेळाडूऐवजी बदली खेळाडू घ्यायला परवानगी नसते.

# रहस्य चमकदार रंगाचे

**कोण होणार?**

सगळ्या प्राण्यांच्या त्वचेचा रंग वेगवेगळा असतो, हे तुम्ही जाणता. बरेचदा त्यांचा अधिवास असणाऱ्या परिसरात मुख्यत्वे आढळणारा रंगच त्यांच्या त्वचेचा असतो. यामुळे ते परिसरात सहजतेने वावरु शकतात. अशा नैसर्गिक घटकांची समरस होणारा रंग असल्यामुळे अगदी जवळून पाहिल्याशिवाय ते दिसतही नाहीत. परंतु समुद्रातील साप, कोरल साप, मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील बेडूक असे काही जीव मात्र चमकदार रंगाचे असतात. त्यांच्या शरीरावर गर्द पिवळ्या, केशरी, गुलाबी यासारख्या रंगांच्या चमकदार पट्ट्या असतात.

या गडद पट्ट्यांमुळे असे जीव हिरव्या पानांमध्ये किंवा मातीत सहज दिसतात कारण ते विषारी असतात. हे रंग इतर प्राण्यांना, विशेषत: त्यांच्या नैसर्गिक शत्रूंना हे खाणे टाळण्याचा इशारा देतात. उदाहरणार्थ, मध्य अमेरिकेत आढळणारा डार्ट-पॉयझन प्रजातीचा बेडूक त्वचेतून विष बाहेर टाकतो. अर्थातच हे धोकादायक भक्ष्य असल्याची सूचना त्याच्या गडद त्वचेमुळे अन्य जीवांना मिळते.

काही सरपटणारे प्राणी चमकदार रंगाचे असतात. ही देखील त्यांच्या भक्षकांना एक प्रकारची सूचनाच असते. त्यांच्या त्वचेतील विषाची चव भयानक असल्यामुळेच विषाचा परिणाम होण्यापूर्वीच पक्षी किंवा साप हे भक्ष्य पटकन थुंकतात. मात्र यदाकदाचित त्यांनी हे गिळले तर मात्र जीवावर बेतते. अर्थात अशाच चमकदार रंगांचे नमुने शतकानुशतके बऱ्याच गैर-विषारी प्राण्यांमध्येही विकसित झाले आहेत. अर्थातच ही भक्षकांना मूर्ख बनवण्यासाठी निसर्गाने केलेली सोय आहे. भक्षक या तेजस्वी रंगाच्या प्राण्यांवर हल्ला करणे टाळतात. ते त्यांना विषारी समजतात. स्वाभाविकच हे प्राणी सुरक्षित राहू शकतात.

# व्हॉईस लॉकने करा फोन अनलॉक

**स्मार्ट ॲप**




सध्या स्मार्टफोनच्या सुरक्षेची विशेष काळजी घ्यावी लागते. यासाठी स्मार्टफोनमध्ये फिंगर प्रिंट स्कॅनर, फेस अनलॉकसारखे फीचर्स दिले जात आहेत. आयफोनमध्ये रेटिना स्कॅनिंगसारखे पर्याय दिले जात आहेत. स्मार्टफोन बनवणाऱ्या कंपन्या अशा पद्धतीच्या बायोमेट्रिक लॉक्सवर लक्ष केंद्रित करत आहेत. यासोबतच तुम्ही आवाजाचा वापर करूनही फोन अनलॉक करू शकता. यासाठी तुम्हाला 'व्हॉईस लॉक स्क्रीन' हे ॲप डाउनलोड करून घ्यावं लागेल. यानंतर तुमचा आवाज ओळखल्यानंतरच फोन अनलॉक होईल. हे ॲप डाउनलोड केल्यानंतर व्हॉइस असिस्टंटवर क्लिक करा. यानंतर एक व्हॉईस कमांड देऊन दोन वेळा पासवर्ड सेट करा. बॅक अपसाठी तुम्हाला नंबरवाला पासवर्डही टाकावा लागेल. सेटिंग्ज पूर्ण झाल्यानंतर व्हॉईस पासवर्डही सेट होईल. आता तुमच्या आवाजानेच स्मार्टफोन अनलॉक होईल. हे ॲप तुम्ही गुगल प्ले स्टोअरवरून डाउनलोड करू शकता. आपला फोन सुरक्षित ठेवण्यासाठीचा हा एक चांगला उपाय आहे. हे ॲप डाउनलोड केल्यावर फोनला हात लावायची गरज पडणार नाही. पासवर्ड म्हणून तुमचं नावही रेकॉर्ड करता येईल.

# चटपटीत आणि पौष्टिक खाऊ

**पोटपूजा**

मित्रांनो, शाळा नसताना सतत भूक लागते ना? पण दिवसभर आरोग्यदायी आहार घेण्याचा नियम पाळा. चला तर मग... आज सुट्टीतल्या खाऊचे टाईमटेबलच बनवू या.

✻ दही फ्रुट चाट: ही लज्जतदार डिश तयार करण्यासाठी आवडत्या फळांचे लहान तुकडे करा. त्यात दही मिसळा आणि नाश्त्यासाठी वा दुपारच्या वेळी खा. हवे असेल तर तुम्ही त्यात ड्रायफ्रूट्स देखील घालू शकता.

✻ मसाला पोहे: दिवसातील कोणत्याही वेळी लागणारी छोटीशी भूक भागवण्यासाठी तुम्ही हेल्दी मसाला पोहे खाऊ शकता. या पोह्यांमध्ये शेंगदाणे, गाजर, सिमला मिरची, ब्रोकोली इत्यादी पौष्टिक भाज्या घालून डिश आणखी आरोग्यदायी बनवू शकता.

✻ ओट्स उपमा: ओट्स उपमा हा देखील नाश्त्यासाठी एक आरोग्यदायी पर्याय आहे. पौष्टिक भाज्यांनी समृद्ध असणारा हा उपमा आरोग्यास अनेक फायदे देतो. यामध्ये जीवनसत्त्वे, प्रथिने आणि फायबरचे प्रमाण चांगले असल्यामुळे संतुलित आहाराच्या कमतरतेवर मात करणे शक्य होते.

✻ मूग डाळ चीला: तुम्ही चविष्ट आणि आरोग्यदायी मूग डाळ चीलाही खाऊ शकता. त्यात पनीर आणि चीज तसेच आवडत्या भाज्या घातल्या की, झाली एक रुचकर डिश तयार...

✻ ड्रायफ्रुट्स लाडू: नट्स, बिया आणि ड्रायफ्रुट्स घालून तयार केलेले हे अप्रतिम लाडू सुट्टीची रंगत नक्कीच वाढवतील. दिवसभरात कधीही भूक लागेल तेव्हा तुम्ही हे लाडू खाऊ शकता. याने रोगप्रतिकारशक्ती वाढतेच खेरीज अभ्यास करण्याची आणि खेळण्याची क्षमताही वाढते. हा खाऊ खाल्ला तर तुम्ही लवकर थकणारही नाही. साखरेऐवजी गूळ वापरुन केलेले लाडू अधिक पौष्टिक असतात. तेव्हा असे लाडू खा आणि ताकदवान व्हा.

# निसर्गसंपन्न ब्राझील

**सफर देशांची**




मित्रमैत्रिणींनो, आज आपण दक्षिण अमेरिकेतल्या ब्राझीलची सफर करू या. ब्राझील हा दक्षिण अमेरिकेतला सर्वात मोठा देश आहे. क्षेत्रफळाचा विचार केला तर जगात त्याचा पाचवा क्रमांक लागतो. ब्राझीलला ७,४०० किलोमीटरची किनारपट्टी लाभली आहे. या देशात अटलांटिक महासागर आहे. घनदाट जंगलं ही ब्राझीलची एक ओळख आहे. ब्राझीलचा उत्तरेकडचा भाग ॲमेझॉन नदी आणि तिच्या आसपास असलेल्या जंगलाने व्यापला आहे. या नदीत विविध प्रजातीचे जलचर राहतात. पिऱ्हान्हा आणि नदीतले गुलाबी डॉल्फीन हे इथलं वैशिष्ट्य आहे. साओ पावलो आणि रिओ दी जानेरिओ ही मोठी शहरं याच भागात आहेत. ब्राझिलिया ही राजधानी आहे. ब्राझीलमध्ये फुटबॉलचं प्रचंड वेड आहे. ब्राझीलने बरेचदा फुटबॉल विश्वचषक जिंकला आहे. या देशात वन्यजीवांच्या असंख्य प्रजाती आढळतात. ६०० प्रजातींचे प्राणी, १५०० प्रजातींचे जलचर, १६०० प्रजातींचे पक्षी आणि विविध प्रकारचे लाखो कीटक यांचं ब्राझील हे घर आहे. या देशातल्या तापमानात वैविध्य आढळतं. तसंच मातीतही विविधता असल्याने इथे विविध प्रकारची पिकं घेतली जातात. इथून ऊस, कॉफी, कोका बीन्स, कापूस, सोयाबीन, तांदूळ आणि स्थानिक फळांची निर्यात केली जाते. ब्राझील हा दक्षिण अमेरिकेतला सर्वाधिक औद्योगिकरण झालेला देश आहे. स्टील, गाड्या, रासायनिक पदार्थ यांचं उत्पादनही इथे होतं.

**ठिपके जुळवा**



# वाढवा वाचन कौशल्य

**स्टडी टिप्स**



वाचन आणि आकलन या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. तुम्ही वाचनाची कला अवगत करून घ्यायला हवी. वाचन नीट जमत नसेल तर त्याचा परिणाम अनेक विषयांवर होऊ शकतो. वाचन आणि आकलनातले हे अडथळे प्रयत्नांनी दूर करता येतील. यासाठी काय करायला हवं याविषयी...

✻ तुमच्या आवडत्या विषयांची पुस्तकं घेऊन वाचा. यामुळे वाचताना तुम्हाला रस वाटेल.

✻ मनातल्या मनात वाचण्याऐवजी मोठ्याने वाचा. यामुळे तुमच्या कानावर शब्द अगदी व्यवस्थित पडतील आणि लक्षातही राहतील.

✻ पुस्तकांचा किंवा धड्याचा मथळा नीट वाचा. यामुळे विषय जाणून घेणं सोपं जाईल. तुम्ही नेमकं काय वाचणार आहात हे कळलं की ते समजून घेता येईल.

✻ गोंधळात टाकणारा भाग पुन्हा पुन्हा वाचा.

✻ वाचताना लक्ष केंद्रित करणं कठिण जात असेल आणि आपण कुठपर्यंत वाचलं आहे हे कळत नसेल तर पट्टी किंवा बोट वाक्यावरून फिरवत रहा.

✻ अर्थ माहीत नसलेले शब्द लिहून काढा. त्यांचा अर्थ जाणून घ्या. यामुळे तुमची शब्दसंपत्ती सुधारेल. तसंच या शब्दांचा वापर तुम्ही वाक्यांमध्येही करू शकाल.

✻ धड्यातलं जे काही कळलं नसेल त्यावरचे प्रश्न लिहून काढा. तुम्हाला नेमकं काय कळलेलं नाही हे लक्षात घ्या. याबाबत शिक्षक किंवा पालकांना विचारता येईल.

## ओळखा पाहू...

**जिज्ञासा**

१) एकाच घरट्यात १०० पेक्षा जास्त अंडी घालणारा पक्षी कोणता?
२) कोणत्या जलचराच्या शरीरात हाडं नसतात?
३) सर्वात जोरात ओरडणारा सजीव कोणता?
४) पश्मिना शाल कोणत्या प्राण्याच्या केसांपासून बनवली जाते?
५) पांढरा रंग पसंत न करणारा प्राणी कोणता?
६) उंट एका वेळी किती लीटर पाणी पिऊ शकतो?
७) मागच्या दिशेने उडू शकणारा एकमेव पक्षी कोणता?
८) जमिनीवरच्या सस्तन प्राण्यांमध्ये सर्वात मोठे डोळे कोणत्या प्राण्याचे आहेत?
९) घरटं बांधणारा एकमेव मासा कोणता?
१०) ऑक्टोपसच्या शरीरात असलेल्या हृदयांची संख्या किती?

उत्तर : १) शहामृग २) जेली फिश ३) हम्पबॅक व्हेल ४) बकरी ५) वाघ ६) १०० लीटर ७) हमींगबर्ड ८) घोडा ९) स्टिकल बॅक १०) तीन

# खेळाच्या हंगामाला सुरुवात करताना...

**हेल्थ वेल्थ**




मुलामुलींनो, तुम्ही एखादा स्पर्धात्मक खेळ खेळता का? शाळेच्या संघाचा भाग आहात का? आता सुट्टीचे दिवस असल्यामुळे तुमच्या खेळाचा हंगामही सुरू असेल. असे असले तरी पहिल्यांदाच एखाद्या क्रीडा स्पर्धेत खेळत असाल तर जरा जास्तच ताण येतो. क्रीडा हंगामाची तयारी नेमकी कशी करायची याविषयी...

✻ या उन्हाळ्याच्या सुट्टीत तुम्ही खूप धमाल करा. मात्र या काळात खूप खाल्लं तर क्रीडा हंगामासाठी पुन्हा तंदुरूस्त व्हायला हवं. त्यामुळे व्यायामाचं नियोजन करा. यासाठी तुम्ही प्रशिक्षक किंवा शिक्षकांची मदत घेऊ शकता. तुमच्या व्यायामाबाबतची माहिती लिहून ठेवा.

✻ खेळासाठी लागणाऱ्या साहित्याची जमवाजमव करा. क्रिकेटसाठी हेल्मेट, पॅड, बॅट, बॉल अशा वस्तू लागू शकतात. नव्या वस्तू खरेदी करणं शक्य नसेल तर जुन्या वस्तू वापरा. पण या वस्तू स्वच्छ आणि वापरण्याजोग्या आहेत याची खात्री करून घ्या.

✻ एखाद्या कॅम्पमध्ये जा. यामुळे तुमच्या तयारीला वेग येईल. अशा कॅम्पमुळे तुमची कौशल्यं चांगल्या प्रकारे विकसित होतात. इतकंच नाही, तर नवा आत्मविश्वास मिळतो.


✻ तुम्ही बॅडमिंटन, टेनिससारखा एकट्याने खेळण्याचा खेळ खेळत असाल तर आठवड्यातून दोन दिवस विश्रांती घ्या. सांघिक खेळ असेल तर एक दिवस विश्रांती घ्या. वर्षातून किमान दोन महिने तुम्ही विश्रांती घ्यायला हवी. यामुळे तुम्ही दुखापत टाळू शकाल.

✻ खेळाच्या हंगामाला सुरूवात करण्याआधी शारीरिक तपासणी करून घ्या. तुमच्या शालेय संघाचा डॉक्टर असतो. त्यांच्याकडून सर्व तपासणी करून घ्या. खेळ खेळण्यासाठी तुम्ही शारीरिकदृष्ट्या सक्षम आहात का हे यामुळे कळू शकेल.




**दोस्त हे मस्त**


### श्रीलंका फ्रॉगमाउथ



दक्षिण भारतातल्या पश्चिम घाटातल्या पर्वतरांगा आणि श्रीलंकेत फ्रॉगमाउथ हा पक्षी आढळतो. घनदाट जंगलात आढळणारा हा पक्षी चॉकलेटी रंगाचा असतो. वेगळ्या रंगामुळे तो पटकन दिसून येत नाही. या पक्ष्याचा डोक्याचा आकार बराच मोठा असतो. तसंच चोचीच्या विचित्र आकारामुळे त्याला फ्रॉगमाउथ असं नाव मिळालं आहे. त्याची नजर खूप तीक्ष्ण असते.

**खादाडी**

### इडली फ्राय



सकाळी किंवा संध्याकाळी केलेली इडली थोडी उरते. मग या इडलीच काय करायचं असा प्रश्न पडतो. शिळ्या इडलीपासून मस्त चटपटीत इडली फ्राय करता येईल. यासाठी उरलेल्या इडलीचे तुकडे करून घ्या. तव्यावर बटर किंवा तूप घाला. गरम झाल्यावर मोहरी घाला. आता त्यावर इडलीचे तुकडे परतून घ्या. मग थोडं तिखट, मीठ आणि पावभाजीचा मसाला घालून परतून घ्या. वरून थोडी कोथिंबीर घाला. गरम गरम इडली फ्राय तयार.

**लाईफस्टाईल**


### पायांना दुर्गंधी येत असेल तर...



तुम्ही बूट घालून खेळता. दिवसभर बुटांमध्येच वावरता. पण घामामुळे पायांना दुर्गंधी येते. आपल्यालाच ते कसं तरी वाटतं. ही समस्या सोडवण्यासाठी तुम्ही काही उपाय करू शकता. पाण्यात चहा पावडर घालून पाणी उकळून घ्या. आता ते गाळून घ्या. कोमट पाण्यात पाय बुडवून बसा. गरम पाण्यात मीठ घालून त्यात काही वेळ पाय बुडवून बसा. शाळेतून आल्यावर पाय साबणाने स्वच्छ धुवून घ्या. सध्या पावसाचे दिवस आहेत. जंतूसंसर्ग टाळण्यासाठी हा उपाय करता येईल.

**योगा टाईम**

### असं करा वॉर्म अप



व्यायाम किंवा खेळाआधी आपण पूर्वतयारी करतो. त्याला वॉर्म अप असं म्हटलं जातं. यासाठी सूर्योदय आणि सूर्यास्त हे व्यायामप्रकार करता येतील. सूर्योदयासाठी स्थितीसाठी ताठ उभे रहा. तीन ते पाच वेळा दीर्घ श्वास घ्या. पुन्हा श्वास घेताना हात वर न्या. पाय जमिनीवर घट्ट रोवा. पाठीचा कणा आणि कंबर वरच्या दिशेने ताणा. आता सूर्यास्ताच्या स्थितीत यायचं आहे. त्यासाठी श्वास सोडत खाली वाका. गुडघे थोडे वाकवा आणि हात खाली जमिनीला टेकवण्याचा प्रयत्न करा. आता श्वास घेऊन पुन्हा ताठ उभे रहा आणि हात वरच्या बाजूला ताणा. हा व्यायाम सहा ते दहा वेळा करा.

# कलासक्त





# प्रदीर्घ कारकिर्दीचा सन्मान

## हेलन व अरुणा ईराणी

शरद कोरडे



स्व. राजकपूर जीवनगौरव प्राप्त झालेल्या अरूणा ईराणीला प्रथम बालकलाकार म्हणून दिलीपकुमारने निर्मिती केलेल्या 'गंगा जमुना' या चित्रपटात १९६१ साली प्रथम संधी मिळाली होती, पुढे आपल्यातल्या अभिनय कौशल्यावर तीने सहाय्यक भूमिका, नायिका व पुढे निर्मिती होण्यापर्यंत मजल मारली. हा वारसा तिला आफजा वडिलांकडून मिळाला होता. १ मे १९४६ रोजी मुंबईत जन्मलेल्या अरूणा इराणीचे वडिल फरदून ईराणी यांची नाटक कंपनी होती व आई सगुणा ही तेलगू अभिनेत्री होती. या दोघांनीही एकत्रित हिंदी नाटकांतूनही कामे केली होती. अरूणा ही घरातील आठ भावंडांतील सर्वांत धाकटी होती. वडिलांची नाटक कंपनी तोट्यात जाऊन बंद पडली होती व घरात पैशांची चणचण भासू लागली होती. छोट्या अरूणाला सहावीपासूनच शाळेचा खर्च परवडत नसल्याने शाळा सोडावी लागली होती. तिला बालकलाकार म्हणून सिनेमांत काम मिळावे म्हणून वडील प्रयत्न करीत होते. एक दिवस दिलीपकुमारने ताडदेव भागात राहणाऱ्या सर्व लहान मुलींना फेमस स्टुडिओत बोलावले होते. त्याला त्यांच्या 'गंगा जमुना' चित्रपटासाठी आजरा या अभिनेत्रीच्या बालपणाची भूमिका करण्यासाठी एक मुलगी पाहिजे होती. आजरा ही नासीद खानच्या (जमुना) प्रेयसीची भूमिका करत होती. स्टुडिओत आलेल्या मुलींमध्ये अरूणा ईराणीही होती. मुलींना मोकळे बोलता यावे म्हणून दिलीपकुमारने एका टेबलावर बिस्कीटे, चॉकलेट व कोल्डड्रींकच्या बाटल्या ठेवल्या होत्या. त्याने सर्व मुलींना सांगितले की, तुमच्यासाठी समोरच्या टेबलावर खाऊ ठेवलेला आहे. तुम्हाला जे आवडेल ते तुम्ही टेबलावरून घ्या. मुलींनी एकच कल्ला केला व टेबलाकडे धाव घेतली. तेथे जाऊन मुली स्वैरपणे पाहिजे ते घेऊ लागल्या व आरडाओरड करु लागला. दिलीपकुमार लांबून हे सारे पहात होता. त्यातील गोरी, देखणी व रेखीव चेहऱ्याची चुणचुणीत मुलगी अरूणा ईराणी त्याला आवडली व त्याने तिची निवड केली. अशाप्रकारे दिलीपकुमार चित्रपटात तिचा प्रवेश झाला. 'गंगा जमुना' १९६१ मध्ये प्रदर्शित झाल्यानंतर पुढे धर्मेंद्र मालासिन्हा यांच्या 'अनपढ' मध्ये अरूणाला मात्र सिंहाच्या बालपणीची भूमिका मिळाली. पुढे 'जहाँआरा' मध्येही अरूणाने मालासिन्हांच्या बालपणीची भूमिका मिळाली. अरूणाला चित्रपटात कामे मिळायला सुरूवात झाल्यावर प्रथम तिला आईने तिला नृत्याचे शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. चित्रपट क्षेत्रात ठाम उभे राहायचे असेल तर प्रथम नृत्याचे शिक्षण घेणे आवश्यक आहे याची जाणीव सगुणाला होती. तोपर्यंत अरूणाने 'झिंगारो', 'सत्यवान सावित्री', 'पारसमणी', 'नर्तकी' 'गंगा की लहरे' आदी चित्रपटांतून छोटी कामे केली होती. पण त्यानंतर १९६६ मध्ये आलेल्या 'फर्ज'मध्ये अरूणा ईराणी नव्या स्वरूपात विकसित झालेली नृत्यनिपुण अभिनेत्री म्हणून प्रेक्षकांसमोर आली. रविकांत नगाईच यांच्या 'फर्ज'मधून पहिला बाँड साकारण्याचा मान जितेंद्रला मिळाला, त्याचबरोबर त्याची नृत्यचपलता पाहून त्याला 'जंपीग डॉक' आधी याच सिनेमामुळे मिळाली. या चित्रपटांतील 'मस्त बहारोंका मै आशिक' या गाण्यावर जितेंद्रबरोबर थिरकण्याची संधी अरूणा ईराणीला मिळाली. लगेच मनोजकुमारला 'उपकार' मध्ये तिला नृत्यांसह एक महत्त्वाची भूमिकाही मिळाली. धर्मेंद्र आशा पारेख यांच्या 'आया सावन झुमके' या चित्रपटांतूनही ती झळकली. याचवेळी तिची जोडी विनोदवीर मेहमूदशी जुळली. 'दो फूल', 'औलाद', 'हमजोली', 'देवी', 'नया जमाना' आदी चित्रपटांत तिने मेहमूदसोबत विनोदी भूमिकांतही रंग भरला. मेहमूद आणि अरूणा ईराणी यांच्या प्रेमप्रकरणाची चर्चा साऱ्या चित्रपटसृष्टीत होऊ लागली. मेहमूदने तिला आपल्या 'बॉम्बे टू गोवा' या महत्वाकांक्षी प्रकल्पात अमिताभ बच्चनसमोर नायिका म्हणून उभी केली. त्यानंतरच्या 'गरम मसाला' या चित्रपटांतही मेहमूदने अरूणा ईराणीला नायिका केली.


'मेरा नाम जोकर' आर्थिकदृष्ट्या अपयशी ठरल्यावर राजकपूरचे प्रचंड नुकसान झाले होते व नवीन यशस्वी चित्रपट देऊन ही हानी भरून काढायची होती. त्यासाठी त्याने टिन एजरच्या प्रेमावर एक कथा के. ए. अब्बास यांना लिहिण्यास सांगितली. त्यावर अब्बास यांनी कुमारवयीन मुलाच्या प्रेमावर हिंदू व ख्रिश्चन समाजातील नायक नायिका डोळ्यासमोर ठेवून पटकथा लिहिली व राजकपूरला ती खूप आवडली. त्यासाठी त्याने आपल्या मुलगा ऋषी कपूर व डिंपल कपाडिया ही ताज्या दमाची जोडी घेतली. त्यांच्यासोबत सहनायिका म्हणून शोभतील अशा कमी वयाच्या व बारीक अंगकाठी असलेल्या दोन देखण्या मुली हव्या होत्या. त्यासाठी अरूणा ईराणी व फरिदा जलाल यांची निवड केली.

अरूणा ईराणीने या 'बॉबी' चित्रपटात काम करावे म्हणून राजकपूरला फोनवर मेहमूदही बोलावे लागले व मेहमूदने अरूणा ईराणीला संमती दिली. नायक शिक्षण घेऊन हॉस्टेलमधून घरी परतल्यावर ठेवलेल्या पार्टीत तो नायिकेला पाहून गाणे म्हणतो 'मै शायर तो नही मगर ए हँसी' या गाण्यावर अरूणा ईराणीला नृत्य करायचे होते. त्यासाठी राजकपूरने नृत्यदिग्दर्शक नेमला नव्हता. ऋषी कपूरला व अरूणा ईराणीला उत्स्फूर्तपणे नैसर्गिक हालचाली करण्याचे आदेश त्याने दिले. त्यानुरूप दोघांनीही समजून ते गाणे चित्रीत केले. अरूणा ईराणीच्या वाट्याला ज्या महत्त्वाच्या भूमिका आल्या. त्यात सुनील दत्तने आपल्या मुलासाठी बनविलेला 'रॉकी' चे नाव घेता येईल. या चित्रपटात रॉकीचा (संजय दत्त) सांभाळ करणारे ख्रिश्चन जोडपे असलेले अमजदखान व अरूणा ईराणी यांनी धमाल उडवून दिली. रॉबर्ट व कैथी झालेल्या या दोघांनी राकेश या नायकाचे 'रॉकी' ठेवलेले असते. या चित्रपटासाठी अरूणा ईराणी हिला एकमेव सहाय्यक भूमिकेचे नामांकन झाले होते. नासीर हुसेन निर्मित 'कारवाँ' या १९७१ च्या चित्रपटात जितेंद्र आशा पारेख सोबत अरूणा ईराणी जितेंद्रसोबत नृत्य करणाऱ्या 'निशा'चे काम केले होते. जी नायकावर प्रेम करीत असते. या चित्रपटात एका खलनायिकी भूमिकेत हेलनही होती. या चित्रपटासाठी सुद्धा अरूणा ईराणीचे सर्वोत्कृष्ट सहनायिकेसाठी फिल्मीफेअरचे नामांकन झाले होते. अरूणा ईराणीला 'बॉबी' १९७४, 'दो झूट' १९७६, 'खून पसीना' १९७८, 'रॉकी' १९८२, 'सुहाग' १९९५, 'कर्तव्य' १९६६ या चित्रपटातील भूमिकांसाठी फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक नायिकेसाठी नामांकन झाले होते. पण 'पेट प्यार और पाप' १९८५ व 'बेटा', १९९३ या दोन भूमिकांसाठी फिल्मफेअरचा सहनायिकेचा पुरस्कार मिळाला. सन २०१२ मध्ये अरूणा ईराणीला फिल्मफेअरचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने स्व. राजकपूर पुरस्कार देऊन सन्मानित केले.

१९९२ मध्ये इंद्रकुमार ईराणी या अरूणा ईराणीच्या भावाने अनिल कपूर, माधुरी दीक्षित यांना घेऊन एका महत्त्वपूर्ण चित्रपटाची घोषणा केली. आपल्या सावत्र आईवर पराकोटीचे प्रेम करणारा तरूण आपल्या आईच्या खलप्रवृत्तीला समजू शकत नाही व त्यामुळे नायिकेला प्रचंड मानसिक तणावाला तोंड द्यावे लागते. या कारस्थानी आईचे काम करावे म्हणून इंद्रकुमारने शर्मिला टागोर, वहिदा रेहमान, मालासिन्हा व शबाना आझमी यांना या लक्ष्मीदेवीची भूमिका करण्याची ऑफर दिली. पण ही खलनायकी भूमिका करण्यास सर्वांनी नकार दिला. शेवटी इंद्रकुमारने मराठी अभिनेत्री भारती आचरेकर यांच्याशी बोलण्याची विनंती अरूणा ईराणीला दिली. ह्या चित्रपट निर्मितीत ती इंद्रकुमारला मदत करणार होती. शेवटी अरूणा ईराणीने स्वतःच ती भूमिका करणार असल्याचे इंद्रला सांगितले. अन्य पर्याय नसल्याने इंद्रकुमारने ते मान्य केले व अरूणा ईराणीने लक्ष्मीदेवीच्या भूमिकेवर आपले नाव कोरले. या चित्रपटातून अरूणा ईराणीच्या कारकीर्दीची दुसरी टर्म सुरु झाली. अनेक चित्रपटातून व दूरदर्शन मालिकांतून त्या आईच्या भूमिकेत व चरित्र भूमिकेत दिसल्या.

अरूणा ईराणींनी 'जमान बदल गया' या हिंदी दूरदर्शन मालिकेत प्रमुख भूमिका केली. 'देशमे निकला होगा चाँद' या मालिकेची निर्मिती व दिग्दर्शन केले. ही मालिका २००१ ते २००५ या काळात सुरू होती. त्यानंतर 'मेहंदी तेरे नाम की', 'तुम बिन जाऊ कहाँ', 'जमीन से आसमान तक', 'रब्बा ईश्क ना होवे', 'वैदेई' आदी मालिकांची निर्मिती केली. त्यांनी मराठीमध्ये दादा कोंडके यांच्या 'आंधळा मारतो डोळा' या चित्रपटातून सुद्धा भूमिका केली होती. अरूणा ईराणी यांनी हिंदी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक कल्लू कोहली यांचेसोबत १९९० मध्ये विवाह केला. ■■

# सिनेरसीकांच्या हृदयातील देव



श्रीराम शेट्ये

सन १९४३ लाहोरमधून धडधडत निघालेली फ्रंटियर एक्सप्रेस अखेरीस मुंबईत येऊन थांबते. उंच देखणा विशीतला रूबाबदार तरूण गाडीतून खाली उतरतो. खिशात हात घालतो अवघे पस्तीस रूपये असतात खिशात. एक अनोळखी शहर समोर उंचच उंच इमारती. माणसांची गर्दी मोटारींचा कर्णकर्कश आवाज. पण त्याला याचा फरक पडणार नव्हता. त्याचे ध्येय ठरलेल आहे. ध्येय गाठल्याशिवाय गुरूदासपुरला परतणार नाही. अवघे पस्तीस रूपये खिशात घेऊन आलेल्या त्या तरूणाने आपले लक्ष्य गाठले. एकदिवस त्याच खिशातून पस्तीस करोड काढून पस्तीस करोडचा चित्रपट बनविला. तो तरूण म्हणजेच चित्रपट रसिकांच्या हृदयावर पासष्ट वर्षे राज्य करणारा देवआनंद.

'आप अगर किसी चीज को दिल से चाहते है तो उसे मिलाने मे पुरी कायनात लग जाती है' दुर्दम्य ईच्छा शक्ती, सकारात्मक विचार, प्रचंड मेहनत याच्या जोरावर माणूस आपले ध्येय निर्विवाद गाठतो. देवआनंदची कहाणी वाचल्यावर तुमच्या हे लक्षात येईल. देवआनंद लाहोरमधून आलेल्या फ्रंटियर एक्सप्रेसमधून मुंबई सेंट्रल स्टेशनवर उतरला. अनोळखी शहर असलेल्या मुंबईत आल्यावर लोअर परेल येथे एका चाळीत आपल्या मित्रासोबत भाड्याच्या खोलीत रूम पार्टनर म्हणून रहायचा. चर्चगेटला पोस्टल डिपार्टमेंट ऑफ आर्मीमध्ये नोकरी मिळाली. त्याने अशोक कुमार यांचे 'किस्मत' 'अछूत कन्या' हे चित्रपट पाहिले. मनात विचार आला मी सुद्धा मोतीलाल, पृथ्वीराज कपूर, अशोक कुमार यांच्यासारखा देखणा रूबाबदार आहे. आपणही असे काम करू शकतो. त्याने मनाशी ठरविलें आणि त्या दृष्टिने प्रयत्न सुरू केले. इंडियन पिपल्स थिएटर असोशिएशन ची मेंबरशिप घेतली. मुंबईत तेव्हा एका ठिकाणी चाय, कॉफी पिण्याच्या बहाण्याने चित्रपटात कामासाठी इच्छुक असणारे तरूण व गरजू लोक एकत्रित येत असत. तिथे देवआनंदला काही मित्रांकडून समजले की प्रभात कंपनीवाले बाबुराव पेंटर एका चित्रपटात नव्या चेहऱ्याच्या शोधात आहेत. देवआनंद प्रभात स्टुडिओत गेला. तेथील गार्ड ने त्याला बाहेर काढले. तेवढ्यात बाबुराव पेंटर यांची गाडी आली. बाहेर त्यांना एक देखणा तरूण आपल्या ऑफिसातून बाहेर निघताना दिसला. त्यांनी आपल्या गार्डला बेल मारली. बाहेर उभा असलेला तरुण कोण आहे ? असे विचारले. त्यांनी देवआनंदचा चेहरा पाहिला. ते भारावून गेले हा मुलगा आपल्या कामासाठी, नक्कीच योग्य आहे.

देवआनंदला आत पाठवायला सांगितले. ऑडिशनसाठी बोलावले. दुसऱ्याच दिवशी दिग्दर्शक पी. एल.संतोषी यांनी ऑडिशन घेतली. देवआनंद यांनी अशी ऑडिशन दिली की, 'हम एक है' या चित्रपटात देवआनंदला हिरोचा रोल मिळाला. त्यानंतर १९४८ मध्ये आलेल्या गिरीश त्रिवेदी दिग्दर्शित 'विद्या' चित्रपटात देवआनंदला सुरय्या सोबत भुमिका मिळाली. एका आलिशान गाडीतून आलेली सुरय्या स्टुडिओच्या एका कोपऱ्यात बसलेल्या देवआनंदकडे पाहतच राहली. पी. एल. संतोषी म्हणाले, आपल्या नवीन चित्रपटात हा हिरो आहे. सुरैया त्या काळातील सर्वात प्रतिथयश अभिनेत्री होती. एक सर्वश्रेष्ठ गायीका होती. वर्षाला आठ लाख रुपये कमाई होती तिची. तीच्या समोर देवआनंद नवखा होता. त्याला महिन्याला चारशे रूपये मिळायचे. देवआनंदचे लोभसवाने व्यक्तिमत्व पाहून सुरय्या पहिल्या भेटीतच त्याच्याकडे आकर्षित झाली होती. एका प्रसंगात दोघे नावेतून नदी पार करत असल्याचे चित्रिकरण सुरू होते. त्या वेळेस अपघात झाला. नाव नदीत बुडाली तेव्हा देवआनंदने सुरय्याला बुडताना वाचवले. सुरय्या म्हणाली, 'आज आप ने मेरी जान बचायी नही तो मै डूब के मर जाती' देवआनंद म्हणाला, 'अगर आप मर जाती तो उसी नदी के पानी मे मै अपनी जान दे देता' 'विद्या' (१९४८) हा चित्रपट हीट झाला. सुरय्या आणि देवआनंद एकमेकाच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. सुरय्याच्या आईने दोघांची शेवटची भेट घालून दिली. सुरय्या ला देवआनंदने लग्ना बद्दल विचारले पण ती प्रचंड दबावाखाली होती. काहीच उत्तर देत नव्हती. परत सुरय्या आणि देव आयुष्यभर एकमेकांस कधीच भेटले नाहीत. सुरय्या आयुष्यभर एकटी राहिली तिने लग्न केल नाही. देवआनंद हेच तिचे प्रेम होते पहिले आणि शेवटचेही. २००४ ला झालेल्या तीच्या मृत्यु पर्यंत ती कृष्णा मंजीलमध्येच अविवाहित राहिली. या प्रेमभंगाच्या प्रसंगातून देवआनंद ला सावरने अवघड झाले होते. नंतर देवआनंद यांने स्वतः मनवकेतन फिल्म कंपनी स्थापन केली. 'बाजी' हा नवकेतनचा पहिला चित्रपट याचे दिग्दर्शन गुरूदत्त यांनी केले होते. टॅक्सी ड्रायव्हर (१९५४) या चित्रपटात देवआनंदच्या सोबत कल्पना कार्तिक ही अभिनेत्रि काम करत होती. दोघांचे प्रेम होते या चित्रपटाच्या सेटवरच देवानंदने तिच्याशी रजिस्टर मॅरेज केले. अभिनेता, दिग्दर्शक, लेखक, निर्माता या सर्वच क्षेत्रात देवआनंदने आपला ठसा उमटवला (१९५६) जब प्यार किसी से होता है (१९६१) गाईड (१९६५) जॉनी मेरा नाम (१९७१) हरे कृष्ण हरे राम (१९७१) असे अनेक सुपरहीट चित्रपट नवकेतन फिल्मचे प्रदर्शीत झाले. देवआनंद यांना २०११ साली साली पद्मभुषण व सन २००२ साली दादासाहेबं फाळके पुरस्कार प्राप्त झाला. 'चार्जशीट' २०११ साली आलेला त्यांचा शेवटचा चित्रपट ठरला.

# माणसाने माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे!




राम कोंडीलकर

जे आत्ताच्या काळात दुर्लभ झाले आहे किंवा मुद्दामहून दुर्लभ केले जात आहे! एखाद्या गोष्टीचा ध्यास घेऊन विलक्षण कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या महनीय व्यक्तींचा गौरव ॲंड फिजच्या 'चैत्र चाहूल'द्वारे विनोद आणि महेंद्र पवारांनी सोळा वर्षे ही समृद्ध परंपरा जपत १७ वे 'ध्यास सन्मान' वर्षे नुकतेच साजरे केले. जेष्ठ प्रयोगशील रंगकर्मी अतुल पेठे यांना जेष्ठ भाषा अभ्यासक राजीव जोशी यांच्या हस्ते आणि लोककलावंत मनोहर गोलांबरे यांना ज्येष्ठ अभिनेते प्रमोद पवार यांच्या हस्ते आणि विनायक गवांदे व डॉ. नीना सावंत यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले. यापूर्वी अरुण काकडे, संजना कपूर, माधुरी पुरंदरे, कांचन सोनटक्के, अरुण होर्णेकर, चंद्रकांत काळे, प्रदीप मुळ्ये अशा अनेक मान्यवरांना ध्यास सन्मान मिळाला आहे.

'पाण्याने भरलेलं तळ पाहिल्यानंतर नैसर्गिकरित्या माणसाला जितका आनंद होतो तितकाच आनंद मला प्रेक्षकांनी भरलेलं नाट्यगृह पाहिल्यावर होतो. नाट्यगृह किती महत्त्वाचे आहे हे आपण सर्वजण जाणतोच! रामानंद शाहिरांनी आत्माराम पाटलांचं जे गीत गायलं त्यामध्ये त्यांनी मनुष्याच्या जाती म्हणजे काय? याविषयी सांगितलं. खरं तर इतका दणकट कार्यक्रम झाल्यानंतर अजूनही आपण त्या भावनांनी उद्रेक झालेल्या किंवा भावनोद्दिपीत झालेल्या अवस्थेत आहोत. मी मात्र जरा शांतच बोलणार आहे. कारण प्रायोगिक नाटक म्हणजे आधी नाटक, मग प्रायोगिक नाटक आणि त्यातला अधिक प्रायोगिक नाटक म्हणजेच 'A minority within a minority' म्हणजेच अल्पसंख्यांक मधला अल्पसंख्यांक असं आमचं नाटक असेल. कारण प्रायोगिक नाटक काहीतरी वेगळं असतं, ते अधिक कश्याचा तरी खोल वेध घेत असते. 'चैत्र चाहूल' या कार्यक्रमातील मध्यास सन्मानाचे मानकरी प्रख्यात प्रयोगशील नाटककार, अभिनेते निर्माते अतुल पेठे बोलत होते. या सोहळ्यात त्यांचा प्रयोगशील रंगकर्मी म्हणून तर लोककलावंत, अभ्यासक आणि संगीतकार मनोहर गोलांबरे यांचा मध्यास सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला

सविस्तर बोलताना पेठे म्हणाले, 'रामानंद शाहिरांनी जे गीत गायले ते इतकं महत्त्वाचं आहे, त्यांनी वर्णन केलेल्या मनुष्याच्या १०८ जाती ऐकता, एका अर्थाने ते माणसांचे केलेले १०८ भेद आहेत. म्हणजे ब्राह्मण आहे, साळी आहे, कोष्टी आहे, माळी आहे, ... आलाना आहे, ...फलाना आहे. पण खरी जात ही आहे की माणसाने माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे, जे आत्ताच्या काळात दुर्लभ झाले आहे किंवा मुद्दामहून दुर्लभ केले जात आहे. हेच सांगण्याचा हेतू आहे, फक्त परंपरा म्हणजे नुसतं दणादणा वाजवून आपलं भावनांनी उद्दीपित होणं नव्हे, त्या परंपरांमध्ये काहीतरी अर्थ दडलेला असतो. त्याच परंपरा राहतात आणि ज्याला परंपरा माहित आहेत तोच नवतेचा वेध घेऊ शकतो. आमचं नाटक या नवतेचा शोध घेणारं आहे. 'ध्यास सन्मान' ज्यांना ज्यांना मिळाले आहे त्यांनी त्यांच्या क्षेत्रात नावीन्य आणले आहे.

लोककलावंत, अभ्यासक आणि संगीतकार मनोहर गोलांबरे यांनाही हा पुरस्कार मिळाला. त्यांनी शाहीर आत्माराम पाटील यांचे कवन गायले. त्यामुळे आपली भाषिक आणि राजकीय समृध्द परंपरा समोर आली. कार्यक्रमात सुरुवातीला जालन्याचे शाहीर रामानंद उगले आणि सहकारी यांचा 'महाराष्ट्राची लोकगाणी' हा लोकसंगीताचा दणकट कार्यक्रम सादर झाला. रामानंद यांची गायनातील ऊर्जा आणि त्यासोबत त्यांचा चफकल अभिनय रसिक प्रेक्षकांना मोहित करणारा होता.

या कार्यक्रमाला प्रख्यात अभिनेते दिग्दर्शक अरुण होर्णेकर, शफाअत खान, प्रदीप मुळ्ये, निळू दामले, श्रीकांत बोजेवार उर्फ तंबी दुराई, रघुनंदन गोखले, प्रमोद पवार, मुकुंद टाकसाळे, अवधूत परळकर, रोहिणी गोविलकर, अरुण कदम, विजयदादा चव्हाण, जयप्रकाश लब्दे, श्याम शिंदे आणि अनेक रंगकर्मी यांची उपस्थिती होती. ■■




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)